# ईस्पर्श

वर्ष पहिले.  अंक दुसरा





ई साहित्य प्रतिष्ठान

ईत्यर्थ: वर्ष पहिले, अंक दुसरा.

जुलै २०१२

संपादक मंडळ:

सुनील सामंत (ठाणे, महाराष्ट्र)

तनवीर सिद्दिकी( बिलासपुर, छत्तीसगढ)

सृजा (औरंगाबाद, महाराष्ट्र)

प्रकाशक

ई-साहित्य प्रतिष्ठान

अकरावा मजला, ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, तीन हात नाका,

ठाणे. ४००६०४.

फोन: ९८६९६७४८२०

©लेखनाचे सर्व अधिकार संबंधित लेखकांकडे सुरक्षित.

© प्रकाशनाचे सर्व अधिकार: ई साहित्य प्रतिष्ठान

अंकात मांडले गेलेले विचार लेखकांची वैयक्तिक मते आहेत. प्रकाशक किंवा संपादक त्यांशी सहमत असतीलच असे नाही

वेबसाईट: www.esahity.com

ईमेल: etyarth.esahity@gmail.com, esahity@gmail.com

# संपादकीय

पावसाळा, येऊ घातलेला श्रावण, ओलीचिंब चातुर्मासाची सुरुवात, वरून झेप घेणाऱ्या प्रत्येक थेंबात ईश्वराचं प्रतिबिंब दिसण्याचा हा काळ. खऱ्या रसिकाच्या प्रत्येक स्पंदनात सध्या पाऊस असेल. आणि पावसासोबत गोंधळ घालत असतील इतरही असंख्य विषय. कुणाच्या पापणीत उद्याची स्वप्नं असतील, कुणाच्या मनात कालच्या आठवणी तर कुठेतरी कुणीतरी अवलिया ओंजळीत आजचं सुख घेऊन ते अर्घ्य अदृष्य़ सूर्यनारायणाला देत असेल. आपापल्या कोशात बसून खिडकीच्या काचेवर उडणारे अमृताचे शिंतोडे पाहताना आज मन सातासमुद्रापार पोहोचत आहे. प्रत्येक नगण्य व्यक्तिमत्वाची एक अजोड अभिव्यक्ती बनून हा पाऊस साती अवकाशांना जोडत आहे.

चहाचा घोट, जुनी गाणी किंवा आवडती वेणुधून आणि पाऊस या नेहमीच्या समीकरणात आता कुठेतरी माझं लॅपटॉप सुद्धा सामावून गेलं आहे. माझ्या पिढीसाठीच वही पेनाची जागा आता कीबोर्ड घेऊ लागलाय. यासाठी आमची पिढी बऱ्याच टीका सुद्धा सहन करते पण त्याचवेळी आसमंतात सामावून राहिलेल्या पावसासारख्याच आमच्या संवेदना सुद्धा आसमंतात सामावल्या आहेत. आज मी जेथे बसून हे शब्द टाईप करत आहे तेथून दूरवर, कदाचित सातासमुद्रापार बसून कुणीतरी उद्याच हे शब्द वाचत असेल ही भावनाच भारावून टाकणारी आहे. अभिव्यक्तीचं हे हक्काचं माध्यम माझ्यासारख्या शेकडोंना उपलब्ध करून देण्यात माझा हातभार लागतो आहे हे तर आणखी खास! त्यामुळेच आज माझं आणि माझ्या लॅपटॉपचं सुद्धा एक आगळंवेगळं नातं आहे.

तसंच नातं आहे माझं आणि माझ्या वाचकाचं. माझ्या मनात उठणाऱ्या प्रत्येक कल्पनेचा, माझ्या स्वप्नांचा, आशा-अपेक्षांचा, आठवणींचा, आनंदाचा, दुःखाचा सगळयांचाच सारांश बनून हा ईत्यर्थचा अंक भरारी घेतो आहे. माझ्या प्रत्येक वाचकाच्या मनाला माझ्या मनाशी आणि इतरांच्या मनाशी जोडून आपलं स्वतःचं असं एक आगळंवेगळं आंतरजाल तयार करतो आहे. त्याच्यासोबत माझं मूर्त स्वप्न सुद्धा भराऱ्या घेत आहे.

अवकाशात विहरताना त्याला माझ्यासारखेच अनेक पक्षी मिळतील. स्वप्नांचे पंख घेऊन भरारणारे. त्या सगळ्यांनाच माझा इथून सलाम.

कळावे. लोभ असावा.

सृजा.

# अनुक्रमणिका

१. आमचे दादा : अविनाश भोमे ६

२. ट्रेक माणिकडोह : धवलधृव ११

३. शाळेचा पहिला दिवस ते शेवटचा : अलका १६

४. ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांच्या सहवासातील संस्मरणीय क्षण : उपेंद्र चिंचोरे २१

५. स. दा. रडके आणि सदानंद : आनंद घारे ३३

६. आमचे क्लासेस जॉईन करा : सागर कोकणे ३८

७. मुलाखत : विशाल कदम ४३

८. जिंदगी का सफर : प्रशांत कुलकर्णी ४९

# " उंची "

*ज्यांची बाग फुलून आली*

*त्यांनी दोन फुले द्यावीत*

*ज्यांचे सूर जुळून आले*

*त्यांनी दोन गाणी द्यावीत*

*ज्यांच्या अंगणात झुकले ढग*

*त्यांनी ओंजळ पाणी द्यावे*

*आपले श्रीमंत हृदय त्यांनी*

*रिते करून भरून घ्यावे .*

*आभाळा-एवढी ज्यांची उंची*

*त्यांनी थोडे खाली यावे*

*मातीत ज्यांचे जन्म मळले*

*त्यांना खांद्यावरती घ्यावे*

*¤दत्ता हलसगीकर¤*

ईत्यर्थ चा हा अंक कवी दत्ता हलसगीकर यांच्या स्मृतीला समर्पित

# आमचे "दादा"

१० जूनला सकाळी वर्तमानपत्रे वाचली अन प्रचंड धक्का बसला. मला वडील बंधूसमान असणारे कवी-मित्र श्री. दत्ताजी हलसगीकर, यांचे सोलापूरला दुखद निधन झाले होते. माझे मन एकदम २३-२४ वर्षे मागे गेले. १९८८ ला मी बँक ऑफ इंडिया मध्ये सोलापूरला बदली होऊन गेलो व त्यानंतर माझे पहिले पुस्तक "तुम्ही अन तुमची मुलं" जुलै १९८९ मध्ये प्रसिद्ध झाले. ते श्री. दत्ताजींना भेट देण्यासाठी मी गेलो होतो. "जिच्या अपार कष्टांमुळे आम्ही हे दिवस पहिले, त्या माझ्या आईला.." मी माझे पुस्तक अर्पण केल्याचे वाचून, दत्ताजींनी, त्याचे कारण विचारले. मी सांगितले. त्यांनीही त्यांची आईवर केलेली कविता मला लगेच वाचून दाखवली. आम्हा दोघांचे डोळे कधी पाणवले हे जाणवलेच नाही. आम्हा दोघांचे लहानपण अत्यंत दारिद्र्यात, कष्टात व हलाखीत गेले असल्यामुळे, आमच्या मनाच्या तारा केव्हा जुळल्या ते आम्हा दोघांनाही कळले नाही. विचार जुळले, मैत्र वाढले, सहवास वाढला, सलगी वाढली.. आणि दत्ताजी आमचे "दादा" केव्हा झाले हेही कळले नाही.

मी नुकत्याच साहित्यिक विश्वात प्रवेश केल्यामुळे व दत्ताजीसारखे मान्यवर कवींची मैत्री, त्यामुळे मीही सोलापूरला साहित्यिक विश्वामध्ये वावरू लागलो होतो. दत्ताजी मला विविध साहित्यिकांकडे, कवींकडे घेऊन जायचे, आवर्जून ओळख करून द्यायचे. त्यांच्यामुळेच आयुष्यातील पहिल्या कवी-संमेलनात मला माझ्या कविता सादर करायची संधी मिळाली व रा.ना. पवार यांच्यासारख्या दिग्गज कविबरोबर मनसोक्त गप्पा मारायचा योगही आला. कंबर तलावाकाठी असलेल्या दत्ताजींच्या घरी आमच्या गप्पांच्या मैफिली जमायला लागल्या. माझ्या पुस्तकाची ३ वर्षात तिसरी आवृत्ती निघाली याचे दत्ताजींना खूप अप्रूप. मग त्यांनी आणि माझा एक मित्र जयंत राळेरासकर यांनी पुढाकार घेऊन तिसऱ्या आवृत्तीचा प्रकाशन समारंभही घडवून आणला. नेमक्या त्याच दिवशी श्री. बाळासाहेब ठाकरे यांची सोलापुरातील पहिलीच सभा (१६ मे १९९३) सोलापुरात जाहीर झाली. आता आमच्या प्रकाशन सोहळ्याला किती लोक येणार? ह्या माझ्या शंकेवर दादांनी धीर दिला....व आमचा प्रकाशन

सोहळा दीड-दोनशे लोकांच्या उपस्थितीत छानपैकी पार पडला. दादांच्याच प्रोत्साहनाने पुढे मी वर्षभर दै.तरुण भारत मध्ये एक मालिका मी लिहली व चालवली. ती खूपच लोकप्रिय झाली. तिचेच नंतर काढलेले पुस्तक "सुसंवाद सहकाऱ्यांशी" व पहिल्या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या याचे दादांना कोण कौतुक. त्यांच्या ज्या-ज्या साहित्यिक मित्रांकडे आम्ही जायचो त्यांचेजवळ ते याचा आवर्जून उल्लेख करायचे व माझी ओळख करून द्यायचे. अत्यंत साधे, सात्विक पण दिलदार व मनमिळाऊ व्यक्तिमत्व म्हणजे आमचे दादा .

मी विडंबन गीते करीत असे. दादा मला आवर्जून ती ऐकवायला लावत. व त्यातील त्रुटी, काय हवे, काय नको हेही सांगत. गप्पांच्या ओघामध्ये त्यांनी एकदा सहजपणे विडंबन काव्यातील गोम मला समजून सांगितली. त्याचा मला खूप फायदा झाला. आता मी आचार्य अत्र्यांवर विडंबन-गीतांचा कार्यक्रम करतो याचेही दादांना खूप कौतुक असे. दौंडमधील एका कार्यक्रमामध्ये उत्कृष्ठ विडंबन काव्याचे पारितोषिकही दादांच्याच हस्ते घ्यायचा गोड योगही आला .

१९८० च्या दशकात जांभूळपाडा गावात ढगफुटी झाली होती. आसपासची ४-५ गावेच्या गावे वाहून गेली. त्याठिकाणी नंतर आपद्ग्रस्तांसाठी आश्रम उभे राहिले. त्या आश्रमाच्या व्यवस्थापकांनी दादांची खालील "उंची" ही कविता आश्रमाच्या प्रवेश दारावर लावायची परवानगी मागितली. दादांनी ती तत्काळ दिली. ती कविता तिथे विराजमान झाल्यावर त्या संस्थेवर दानशूर लोकांनी देणग्यांचा असा काही वर्षाव केला की त्यांची अवस्था "दुबळी माझी झोळी." अशी झाली . त्यांच्या ह्या कवितेने "दानाची" व लोकप्रियतेची अशी काही "उंची" गाठली की विचारता सोय नाही. आज महाराष्ट्रातील अनेक सामाजिक व सेवाभावी संस्थांच्या प्रवेश-दारावर ती विराजमान झाली असून, त्या सर्व संस्थांवर दानवीर लोकांची खास मेहेरनजर वळलेली आहे. व त्या संस्थांवर लाखो रुपयांच्या देणग्यांचा वर्षाव झालेला आहे. अंतर्नाद मासिकाचे संपादक श्री. भानू काळे यांनी त्यांच्या मासिकाच्या १९९०-९२ च्या एका अंकामध्ये या कवितेला मुख-पृष्ठावर मनाचे स्थान सालंकृत दिले होते, याची आज आवर्जून आठवण येते.

१९९४ साली मी पुण्यात परत बदली होऊन आलो. त्यांनत दादा पुण्यात केव्हाही आले की पहिला फोन मला असायचा "अविनाश, मी पुण्यात आलो आहे इतके दिवस मुक्काम आहे.." दादांना पुण्यातील वाहतूक, रस्ते, वेगवेगळी ठिकाणे, लांबची अंतरे याबद्दल एकप्रकारची काळजी वाटायची. मग त्यांना त्यांच्या विविध साहित्यिक मित्रांकडे घेऊन जायची जबाबदारी आपसूक माझ्याकडे यायची. आम्हीही आमच्या M-80 वर मनसोक्त हिंडायचो. पुलंच्या ८१ व्या वाढदिवसाचे दिवशी दादांचा एकदम सकाळीच फोन,

" मी पुण्यात आलेलो आहे. आपल्याला भाई-कडे ( पु.ल.) जायचे आहे. त्यांचे नवे घर माहितेय का?" अर्ध्या तासात आम्ही पु.लंच्या घरी हजर. पु.ल. तेव्हा खूप आजारी होते. आम्ही पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिष्टचिंतन केले. दत्ताजींकडे पाहून पु.ल.म्हणाले, "नाव आठवत नाही" दत्ताजींनी नाव सांगितल्यावर पुलंनी तत्काळ कोटी केली, " हा सलगी करतो.असे लोक म्हणतात खरे " त्याही अवस्थेत पुलंच्या ह्या तत्काळ कोटीवर उपस्थितांमध्ये जोरदार हशा पिकला.

दादांनी त्यांची, "उन्हातल्या चांदण्यात" व "चाहूल वसंताची" हे दोन काव्य संग्रह मला प्रेमाने भेट दिले. ती माझी लाख मोलाची ठेव आहे. माझ्या घरी दादा आले की येथेही गप्पांच्या मैफिली रंगायच्या. असेच एकदा दादा आले होते, तेव्हा दादांच्या ३-४ गाजलेल्या कविता ( चट चट चाललेत नाजूक पाय, रंगावली, आई व उंची ) दादांनी गाऊन दाखवली व ती मी टेप करून ठेवलेली आहे.

दादांच्या कवितेत भव्य दिव्य असे नाही, त्याबद्दल त्यांना खंत नाही. पण त्यांच्या कवितेत स्वानुभूति आहे, निसर्गसिद्ध आढ्यता व रसगंध त्यात ओतप्रत भरलेला आहे. माणसातील सद्भावनेला मनापासून हाक मारणारी आहे, आव्हान करणारी अशी दादांची कविता आहे .

वडीलधाऱ्यांवर व जीवनावर, आई आणि गुरूंवर श्रद्धा ठेवणारी आहे. म्हणूनच ती मनाला भावते, आत कुठेतरी मनात जाऊन रुतून बसते. हेच महत्वाचे. असा आमचा मनमोकळा, सालस, प्रेमळ व दिलदार कवी मित्र आज आमच्यात नसला तरी त्यांच्या असंख्य कविता आपणा सर्वांनाच कायमच्या साथ व आनंद देतील, मार्गदर्शन करतील, याबद्दल खात्री आहे. अशा आमच्या दादांना विनम्र श्रद्धांजली .

अविनाश भोमे.
३ कल्पिका सोसायटी, शीला विहार
वसाहत, कर्वे रोड, पुणे-३८.
(भ्रमणध्वनी : ९८८१६-४०४४७)
avinashbhome2004@yahoo.co.in

# ट्रेक माणिकडोह....

विवेक आणि हरेश दोघेही ट्रेक ला गेले, इथे समीर आणि विन्या परीक्षा देताहेत. आपण मात्र काय करायचं? अस नेहमीचा प्रश्न घेऊन दिन्या दारात उभा. मी त्याला म्हणालो सध्या झोपा काढ. दोघांच्या परीक्षा संपल्या म्हणजे आपणही जाऊ ट्रेक ला. तसा तो जरासा खुश झाला आणि घरी जाऊन ट्रेक च्या तयारीला लागला. आता तसे मलाही तयारीला लागणे भाग होतेच म्हणायला. कारण जुना टेन्ट आता भरपूर झिजला होता. नवीन आणायचा होता. भरपूर शॉपिंग करायची होती. मग दिन्यालाच घेऊन गेलो आणि सगळी तयारी करून घेतली. समीर आणि विन्या परीक्षा देऊन आले आणि आम्ही असे चौघे निघालो. विवेक आणि हरेश ह्यांना आम्ही मधल्याच पोइन्टला गाठणार होतो. ह्या टोळीचा म्होरक्या मीच. नकाशा, टेन्ट, बॅटरी, दोऱ्या माझ्याच कडे. मॅगी, पाणी, फर्स्टएड, डिशेस, भांडी बाकीच्यांकडे. बोलता बोलता आम्ही गाडीतून खाली उतरलो. आणि माणिकडोहच्या मागच्या बाजूला उतरलो.

माणिक डोह म्हणजे जुन्नर मधील एक मस्त ठिकाण. पाणीच पाणी आणि आजूबाजूला ट्रेकर्स ला खुणावणारे उंचच उंच डोंगरकडे. हिरवळ. मस्त सगळे. ह्या आधी इथे आम्ही आलो नव्हतो. म्हणजे मी सोडून बाकीचे. मी लहानपणी आलो होतो, शिवनेरी, नाणेघाट वगैरे वगैरे पाहिले होते. इतक्यात दिन्या ने समोरचा बोर्ड वाचला "इथे बिबटे आढळून येतात. कृपया गटाने फिरावे. हातात काठी अन्यथा आणखी शस्त्र बाळगावे" झाले. दिन्या अगदी गार पडला. कसाबसा त्याला समजावून आम्ही पुढे निघालो. माणिकडोह च्या बाजू बाजू ने आम्हाला नाणेघाटात जायचे होते. दुपारी ऊन जरा जास्तच लागत होते. इतक्यात पाणीही संपले होते. समीर बाटल्या भरायला पाण्याकडे गेला आम्ही तिघे इथे जरा सावलीला बसलो. इतक्यात दिन्या आणि विन्या जरा हलके होऊन आले. आणि माझीही एक डुलकी झाली. समीर ने जरासे

पाणी तोंडावर टाकून मला उठवले. आणि आम्ही परत निघालो. आता चढण जरा जास्त होती. झाडंही दाट होऊ लागली होती. विवेक ला फोन करून आम्ही विचारले कुठे आहे ते आणि मग त्यांना गाठायला आम्ही सर सर निघालो.

पिंपळगाव जोगा धरण आणि माणिकडोह ह्या मध्ये एक डोंगररांग आहे. त्यात अगदी मधला असा एक डोंगर चंद्रासारख्या आकाराचा आहे. तिथेच विवेक आणि हरेश थांबले होते. आम्ही जवळ पास पोहोचलोच होतो इतक्यात चढताना दिन्याचा पाय मुरगळला. आई ग. आता काय. स्प्रे मारा आणि निघा. संध्याकाळ होत आली यार. थांबून उपयोग नाही. We have to move. दिन्या बिचारा रडत कढत चालू लागला.

आला आला डोंगर जवळ आला. इतक्यात लांबून कुणी येताना दिसले. दिन्या जरासा फुलला होता. कसला आता तर एकदम सुपरमेन झाला होता. कारण समोरून विवेक आणि हरेश नाही तर दोन सुपर डुपर फट्याक पोरी येत होत्या. त्याही ट्रेकर्स होत्या बहुतेक. पण फार त्रासिक दिसत होत्या. एकीला गुडघ्याला काही लागले होते. त्यांना पाहून दिन्या अगतिक होऊन जवळ गेला अगदी आमच्या आधीच. थोडीसी विचारपूस झाल्यावर कळले की त्यांची चुकामुक झाली आहे. त्यांचा ग्रुप त्यांना सोडून निघून गेले. ह्या मुली न अश्याच असतात. नेहमी उशीर मग आणखी काय करणार ते ग्रुप वाले. विन्या ने नेहमी प्रमाणे काडी टाकली. तितक्यात त्यातली व्यवस्थित असलेली शमिका, विन्याला म्हणाली "रात्री, आम्ही झोपेत असताना एका बिबट्याने आमच्या कॅम्पवर हल्ला केला. त्यात सगळयांची पांगापांग झाली. आणि तसेच त्यात मग आमचे मोबाईल आणि साहित्य असेच तिथे पडून राहिले. आता आमच्या कडे काहीच नाही. अंगावरच्या कपड्याशिवाय." आणि अक्षरशः ती रडू लागली. त्यातच त्या हीना ला मार कसा लागला ह्याचे कळले. मग काय त्यांना आमच्यात सामील करून आम्ही विवेक आणि हरेशला गाठायला निघालो. आता पर्यंत त्या मुलींनी आमच्या मोबाईलवरून घरी आणि इतर ग्रुप

वाल्यांना कळवले होते. आम्ही आता विवेक आणि हरेश ला गाठून कॅम्प बंद करून घरी परतणार होतो.

संध्याकाळी ६.३० च्या सुमारास. तो चंद्रकोरी डोंगर भेटला. आम्ही सगळे एकत्र भेटलो. आणि सगळी माहिती सांगून आता परतीची वाट धरू लागलो. खरं तर तिथे बिबट्याने हल्ला केला म्हणून जास्त धमक करायची सोडून आम्ही परतण्याचा निर्णय घेतला. आता पर्यंत त्या दोघी आमच्यात भरपूर मिसळून गेल्या होत्या. हसत खेळत आम्ही चालत होतो.

बोलता बोलता आता रात्र झाली होती. आम्ही टेंट लावले. मुलींना टेंट मध्ये झोपायला सांगितले. आणि उरलेले दोघे कॅम्पफायर कडे लक्ष देतील असे ठरले. भूकही लागली होती. पाणी वगैरे काढून आम्ही मॅगी तयार केली. पोटभर खाल्ली. आणि गाणी वगैरे बोलून थकून मग झोपायला निघालो. विवेक आणि हरेश हे जागणार होते.

रात्री ११.३० च्या दरम्यान अचानक टेंट च्या मागे कसली तरी हालचाल दिसली. विवेक ने शिटी वाजवून सगळयांना जागे केले. आम्ही टेंट मधून बाहेर आलो बघतो तर काय, तीन बिबटे एकमेकांत भांडत होते. आगीमुळे ते जवळ येत नव्हते. दिन्याची तर बोबडीच वळली. विवेक आणि हरेश हुश्शार झाले. समीर ने काठी हातात घेतली. विन्याने बॅटरी त्या बिबट्यांच्या डोळयात मारायला सुरुवात केली. इतक्यात मी सुरी काढून हातात धरली. जवळ पास अर्धा तास हा खेळ चालला. त्यांना हुसकावण्यात बराच वेळ गेला.

पण त्या टेंट मधील पोरी अजून बाहेर आल्या नव्हत्या. ते बिबटे गेल्यावर आम्ही टेंट मध्ये पाहिले तर मुली गायब. कुठे गेल्या असतील? शोधाशोध सुरु. आम्ही टेंट वगैरे बांधून त्यांना शोधायला निघालो. तेही अगदी गटाने. एक एकटे नाही. बऱ्याच वेळा नंतर कुणाचा तरी रडण्याचा आवाज ऐकू आला. जवळ जाऊन पाहतो तर ही तर हीना. हिचा गुडघा जखमी असून ही इतकी का पळाली? बरं शमिका कुठेय? ती इतकी गप्प झाली की काहीच बोलत नव्हती.

आम्हाला वाटले काही तरी वाईट घडले असेल. काही वेळा नंतर ती बोलली कि शमिका पुढे पळाली. मग हीना ला पाठमोरी घेऊन. समीर आणि आम्ही निघालो. समीर दमला कि विन्या घेई मग हळू हळू ते माझ्यापर्यंत येई. दिन्या वाचला कारण तोही पायाने चुकला होता ना.

२.३० वाजता शमिका सापडली. अगदी विव्हळत होती ती. बघतो तर तिच्या पायाला. सापळा होता. त्याने तिचा पाय पूर्णपणे जखमी केला होता. मग काय तिला त्यातून सोडवले. दवा पट्टी केली. आणि निघालो तिला हि पाठमोरी घेऊन. काय हालत झाली होती म्हणून सांगू. कशाला इतकी मदत करत होतो त्या मुलींची काय ठाउक ? पण तरी आता ते विधिलिखित असेन असे मानून चालत राहिलो. आता रस्ता दिसू लागला होता. कारण काही गाड्या येत जाताना दिसत होत्या. आम्ही आता जंगल सोडले होते. माणिकडोह धरणाच्या बस स्थानकाजवळ एक छोटेखानी घर होते तिथे आम्ही थांबायचे ठरवले.

त्या मुली एकदम गप्प झाल्या होत्या. कुणीच कुणाकडे पाहत नव्हते फक्त त्या घराकडे कूच करत होतो. अचानक मला जाणवले की पाठीवरचे ओझे अगदीच कमी झाले आहे. मी लक्ष दिले नाही. वाटले आता सवय झाली असेन. दोघींना त्या घराजवळ उतरवून हवे तर आराम करू. तितक्यात समीर म्हणाला "अग हीना तू इतकी हलकी कशी झालीस ग?" काहीच आवाज नाही. मी बघतोय तर हीना आहे कुठे त्याच्या पाठीवर? "सम्या अरे ती हीना कुठेय?" " कुठेय म्हणजे? ही काय पाठीवर." असे म्हणत त्याने पाठी पाहिले तर एक मेंढरू त्याच्या पाठीवर होते.

तसेच एक माझ्याही पाठीवर होते. दोघांच्याही हृदयाचा ठोकाच चुकला. दिन्याने तर जीन्स ओलीच करून टाकली. घाबरलेले आम्ही ती मेंढर तशीच सोडून पळत पळत त्या घरापाशी पोहचलो. आमचा आवाज ऐकून घरातला एक माणूस बाहेर आला. पाणी पाजून त्याने अगोदर

आम्हाला शांत केले. अन मग विचारले काय झाले ते. त्याला आम्ही सगळी हक्किकत सांगितली. त्यावर तो म्हणाला. "काय फजिती करून घेतली पोरं हो. असं जंगलात कुणी पोरी घावत्यात होय? अरे हडळी होत्या त्या. अन ते बिबटे नव्हते काय. जादू टोना होता. नाहीतर त्यांनी तुम्हाला असेच सोडले असते काय? हे काय तुमच्या सोबत नाही झालं. ह्या बाजून जाण्याऱ्या चार पाच लोकांसोबत  झालाय ते. तुमी उगाच गेलात ह्या बाजून." त्याने सांगितलेले पटले ही. पण मग त्या हडळींनी आम्हाला काही का केले नाही? बरं मोबाईल मध्ये केलेले कॉल पाहिले तर काहीच एन्ट्री  नव्हत्या. असे कसे? हाच विचार करत करत आम्ही घरी पोहचलो. भूत बित काही नसते. असे मनोमन ठरवत. झाला प्रसंग सारे विसरण्याचे ठरवून आम्ही पुन्हा रात्री भेटलो.

आता पुन्हा पुढच्या महिन्यात ट्रेक तोही पुन्हा माणिकडोहच..!! बघू त्या हडळी भेटतात का?

सुजित (धवल ध्रुव)

अंधेरी, मुंबई

९९३०२९३९२९

suj.the.rose.for.u@gmail.com

# शाळेचा पहिला दिवस... ते शेवटचा...

शाळेचा पहिला दिवस म्हटलं की आताची मुलंच डोळ्यासमोर येतात. आता मुलं नर्सरी पासूनच शाळेत जायला लागतात. अडीच तीन वर्षांची असताना. साहजिकच ती रडतात. पण मी शाळेत जात होते तेव्हा. (फार फार वर्षापूर्वीची गोष्ट. कधीची तेही आठवावं लागतंय.) सहाव्या-सातव्या वर्षी पहिलीत प्रवेश असायचा. ज्युनिअर सिनिअरही नव्हते. नर्सरी तर लांबची गोष्ट.

घरातली मोठी भावंडं, आजूबाजूची मुलं शाळेत जाताना नेहमी पाहिलेली असायची त्यामुळे आपण शाळेत कधी जाणार याची उत्कंठाच निर्माण व्हायची तोवर. आणि सोडायला आई-बाबांनी यायचं हा प्रकार तर अजिबातच नव्हता. मोठ्या भावंडांचा हात धरून पाठवलं जायचं. उत्कंठा तर अमाप असायची. पण शाळेत त्याने पहिलीच्या वर्गात बसवून दिलं बोट सोडून आणि गेला की प्रचंड बावरल्यासारखं वाटत राहायचं अनेक दिवस. आता तर शाळेबाहेर जेवढी मुलं तेवढ्या आया किंवा पालक दिसतात. शाळा भरताना आणि सुटताना.

मी तर अगदी लहान गावात शाळा शिकले. पहिली ते सातवी अगदी खेडं होतं. आणि आजूबाजूला पाचेक किलोमिटरच्या परिसरात त्याहून छोट्या वाड्या, कोंड, खुर्द-बुद्रुक गावं. तिथं फक्त चौथी पर्यंत शाळा असायच्या. मग पाचवी पासून  तिथली मुलं आमच्या शाळेत यायची. चालत. पाचवीतली मुलं म्हणजे दहा बारा वर्षांची. पण ती उन्हा-पावसात, शेतांतून, बांधावरून, वाटेत एखादा ओढा, नाला असं पार करून ती मुलं यायची. सोबती सोबतीनं. पण त्यांचेही आईवडील कधी आलेले पाहिले नव्हते तेव्हा.

माझ्या मोठ्या भावाला थोड्या शहरवजा गावात सातवी पासून एका ओळखीच्या घरात शिकण्याकरिता ठेवलं. तो शनीवारची सकाळची शाळा करून दर आठ-पंधरा दिवसांनी पंधराएक किलोमिटर चालत घरी यायचा आणि सोमवारी सकाळी लवकर उठून अकराची शाळा गाठायचा. हे आठवलं की असं वाटतं आपण हल्ली मुलांची जरा अतीच काळजी करतो का? की काळ बदललाय? मुलांवर अभ्यासाचीही सक्ती करतो. मार्कांचं दडपण आणतो. माझ्या पिढीत फुल्ल नापास होईपर्यंत कुणाचेच पालक मुलांच्या अभ्यासाच्या बाबतीत विचारपूस करीत नसत. मनसोक्त खेळू देत. हुंदडू देत.

बाय द वे. यावरून व्यंकटेश माडगूळकर यांची "शाळा" ही कथा आठवली. तीन चार मुलं एकदिवस शाळेत जायला निघून शाळेत न जाता रानात हुंदडत राहतात तेव्हा दिवसभर घेतलेल्या वेगवेगळ्या अनुभवांचे अतिशय सुंदर चित्रण त्यात आलेलं आहे. आणि असं वाटतं की खरंच. वास्तव ज्ञान तर शाळेच्या आतल्यापेक्षा शाळेच्या बाहेरच अधिक मिळतं. म्हणून तर माडगूळकर पुढे जाऊन थोर साहित्यिक झाले. शिवाय त्यांचे थोरले बंधू गदिमा तर मॅट्रीकच्या परिक्षेत नापास झाले म्हणून वडिल रागवले तर जेवणावरून उठून घर सोडून थेट कोल्हापूरला निघून गेले. आणि जवळजवळ वर्षभर घरच्यांना त्यांचा पत्ता नव्हता. त्यांची माऊली येणा-या जाणा-या प्रत्येकाजवळ चौकशी करत राहिली की माझा गजानन दिसला का कुठं शहरात म्हणून. आणि इथं गजानन महाराज भालजी पेंढारकरांच्या कोल्हापूर येथील स्टुडीओत होतकरू लेखक-कवी म्हणून दाखल झालेले!!

अशा दांड्या शाळेत असल्यापासूनच आम्ही पण खूप मारल्या. गणितात अगदी झिरो मार्क्स पण मिळवले एकदा चाचणी परिक्षेत (वीसापैकी शून्य). पण शाळेबाहेरचं ज्ञानही फारसं काही मिळवलं नाही.व्यंकटेश माडगुळकरांप्रमाणे. सातवीनंतर तालुक्याच्या गावी दहावीपर्यंत तीन वर्षे मामाकडे राहून शिकलो सगळी भावंडं. त्यावेळी छोट्या खेड्यावरून आलेली अशी अनेक भाचरं आपापल्या मामांकडे, काकांकडे राहून शिकायची. अधिकतर मामाकडेच. आणि मामा

देखील ते आपलं कर्तव्यच समजायचा. आता असं चित्र कुठं असेल का माहित नाही. काळ खरंच बदलला खूप बदलला.

तिथंही शाळा जवळपास मैलभर लांब होती. घरासमोरच हायवे होता तो ओलांडून जायचं. पण पहिल्या दिवशीही कोणी सोडायला आलं नाही. बाबा येऊन चार दिवस आधीच मामांकडे सोडून गेले फक्त. मग मामाकडे इतर भावंडं. दुस-या मामाचीही होती शिकायला त्यांच्याबरोबरच शाळा गाठली. डबा घेऊन शाळेत जाणं हे उगाच आपलं कौतूकाला असायचं अधूनमधून. अकराला पोटभर जेवूनच शाळेत जायचं. तीनच्या मधल्या सुटीत कधी घरी यायचं चहा वगैरे प्यायला (आम्हाला चहा पिऊ देत बिनधास्त. दूध वगैरेचे लाड नव्हतेच. शिवाय कोकणात दूधाची वानवाच होती त्या काळात) नाहीतर शाळेतच टाईमपास करायचा दहा पंधरा मिनिटं. शाळेच्या समोर मोठी आमराई होती. तिथ जाऊन वेळ घालवायचा. साडेपाचला सुटलं की तडक घरी.भूक प्रचंड लागलेली असायची. मामी काही चिवडा, काकडीचे वडे वगैरे करून ठेवायच्या. ते थोडं थोडं प्रत्येकाच्या हातावर ठेवायच्या. तो खाऊन खेळणं (जे मी कधीच खेळले नाही) गृहपाठ करणं की. आठला गरमागरम जेवण जेऊन पुन्हा काही वाचन, गप्पा करून साडेनऊ दहाला झोपून जायचं.

रेडीओ असायचा. मामा श्रीमंत होता. त्याच्याकडे १९७२ सालीच पहिला टीव्ही आला होता. पण त्यावर आमची माती आमची माणसं आणि छायागीत हे दोनच कार्यक्रम होते तेव्हा. आणि आम्हाला आमची माती आणि आमची माणसं यांचं काही कौतूक नव्हतं तेव्हा कारण ती दोन्ही अवती भवती भरपूर होती. वेगळी टीव्हीवर पाहण्याची आवश्यकता नव्हती. छायागीताचं मात्र अप्रूप होतं. पण उपकार केल्यासारखं पाचसहा गाणी दाखवायचे तीही कधीकधी अर्धवट. आठवड्यांतून एकदाच.

अशारीतीने दहावीपर्यंतचा काळ गेला. आणि पुन्हा गावात पुढची शाळा नाहीच. मग शेजारच्या गावी १२ वी पर्यंतचे वर्ग होते. तिथं एस. टी.ने जाऊन येऊन ती दोन वर्ष पूर्ण केली.

यातही छळ असा होता की दहावी - बारावीच्या परिक्षेचं केंद्र दुस-या गावी असायचं. त्याचं प्रचंड टेन्शन यायचं.कारण त्या गावात जायला ज्या काही मर्यादित एस.टी. असायच्या त्यावर अवलंबून राहावं लागायचं. त्या आल्या, नाही आल्या, उशिरा आल्या तर? या काळजीत अर्धा जीव. अर्धा इंग्रजी-गणिताच्या शत्रूंनी थरकापलेला. अशा अवस्थेत परीक्षा द्यायच्या. पुरेशी पुस्तकं, क्लास असलं काही नव्हतं. एकमेकांची पुस्तकं, गाईड्स घेऊन निभवायचं. (तेव्हा शाळेला मारलेल्या दांड्या, शिक्षकांचं समजावणं आठवायचं. पण वेळ निघून गेलेली असायची तोपर्यंत. आणि आता एकला चालो रे शिवाय गत्यंतर नाही. हे आपोआप शिकायला मिळायचं.)

दहावीच्या परीक्षा केंद्राच्या ठिकाणी एक लांबचे काका राहत होते. बाबा म्हणाले त्यांच्याकडे रहा परिक्षेपुरतं. म्हणून रहायला गेले आणि दुस-याच दिवशी त्यांची म्हातारी आजी वारली. घरात हा गोंधळ. ते काही म्हणाले नव्हते तरी मीच निघून आले पुन्हा घरीच. मला आता आश्चर्य वाटतं की या सगळ्या काळज्या आम्ही आमच्या इवल्याश्या जीवावर वाहायचो. पण पालकांना त्याचं काही सोयर-सुतक नसायचं. आणि आता आपण मुलांच्या किती काळज्या वाहतो. पण त्यामुळेच आपण त्यांना अधिक परावलंबी करून ठेवतो असं वाटतं. त्यांचं त्यांना झगडूच देत नाही आपण. सगळं आयतं वायतं मागण्याआधीच. कधी कधी तर गरजेआधीच देऊन ठेवतो आपण.

अशारीतीने दहावी-बारावीचे दोन महत्त्वाचे टप्पे संपले आणि शिक्षणाला तिथंच राम राम घडला. कारण पुन्हा तेरावी करिता आणखी पुढच्या, दूरच्या गावी जावं लागणार होतं. बारावीत पास झालेल्या मुलींमध्ये मी एकटीच. आणि काही मुलं. शी. सोबत नाही मैत्रिणी तर कसं जायचं एकटं एवढ्या लांब. अशी अत्यंत संकुचित त्या काळाला अनुसरून झालेली

मानसिकता. आणि लगेच एका बँकेत मिळालेली नोकरी यामुळे पदवी मिळवायला पुढे पंधरा वर्षाचं मध्ये अंतर पडलं. लग्न होऊन मुलगा झाला. तो शाळेत जायला लागला ज्युनिअरला आणि मी प्रथम वर्ष कला विभागात प्रवेश घेतला. तिसाव्या वर्षी. आणि आयुष्यात न मिळालेला फर्स्टक्लास एम.ए.च्या शेवटच्या वर्षी मिळाला..!!

अशी ही साठा उत्तराची कहाणी सफळ-संपुर्ण झाली. पण उशीरा उशीरा.

अलका असेरकर

ए १ अनामिका सोसायटी ओल्ड डोंबिवली रोड डोंबिवली प. मो. ९९८७८०७८५६

# ज्येष्ठ कवयित्री शांताबाई शेळके ह्यांच्या प्रदीर्घ सहवासातील संस्मरणीय क्षण :

"चिरंजीव चिंचोरे, तुम्ही छान लिहिता, तुम्हाला चांगली संधी मिळाली पाहिजे, मिळेल, मिळेल !" पूज्य शांताबाई शेळके, ह्यांचे हे आश्वासक उद्गार मी अनेकवेळा त्यांच्या मुखातून ऐकत असे !

आकाशवाणी पुणे केंद्राच्या, दुस-या मजल्यावरील टॉक स्टुडिओमध्ये, मी माझ्याच कवितांच्या ध्वनिमुद्रणासाठी माईकसमोर उभा होतो. तेथील तंत्रज्ञांनी मला काही सुचना केल्या. माझ्या हातामध्ये कवितांचे कागद होते, पण मनामध्ये पूज्य शांताबाईंचे वरील वाक्य जागे झाले होते. शांताबाईंच्या पवित्र आठवणीने मी जरासा हललो. आज मला आकाशवाणी केंद्रावरून माझ्याच कविता वाचनाची संधी मिळाली पण त्या ऐकायला शांताबाई कुठे आहेत ? आज त्या लाक्षणिक अर्थाने नाहीत तथापि आजचा दिवस, "सहा जून", शांताबाईंच्या प्रथम पुण्यतिथीचा ! त्या पावन आत्म्याचा मला खरा कृपाशीर्वाद लाभला.

खूप लहानपणापासूनच अगदी मी शाळेत असल्यापासूनच मला शांताबाईंच्या कविता मनापासून आवडायच्या ! त्यांनी लिहिलेली गाणी मी कान देऊन ऐकायचो. त्यांच्या कविता, त्यांचे लेख मी आवर्जून वाचायचो. शांताबाईंचे सोपे शब्द, बोली भाषा, चित्रदर्शी वर्णनं ह्यांनी माझ्या मनाचा केव्हांच ठाव घेतला होता. बघता-बघता, माझ्या त्या

पोरवयात, शांताबाई शेळके माझ्या श्रद्धास्थान झाल्या.

मला अजून आठवतंय, चाळीस वर्षांपूर्वीपासून मी त्यांना पत्रं पाठवीत आलोय. तेव्हां पोस्टकार्ड पाच पैशाला मिळायचं !शांताबाई तेव्हां दादरला राहायच्या. माझ्यादृष्टीने आनंदाचा भाग

म्हणजे, माझ्या भाबड्या भावनेला दाद देणारी, शांताबाईंची असंख्य पत्रोत्तरेही मला येऊ लागली. आजवर मला आलेली त्यांची सर्व पत्रं मी मोठ्या आदराने जपून ठेवली आहेत. त्यांची सुवाच्च वळणदार अक्षरातील  पत्रं म्हणजे माझा मोठा ठेवाच होय. पुढे शांताबाई दादरहून, बांद्र्याला साहित्य सहवासमध्ये राहायला गेल्या. एकदा मी एका पत्रात त्यांच्या भेटीची इच्छा व्यक्त केली.  शांताबाईंचे मला लगोलग पत्रं आले, "मुंबईला याल, तेव्हां अवश्य घरी या".एकदा एका घरगुती समारंभासाठी मी मुंबईला गेलो होतो. रविवारचा तो दिवस होता. सकाळचा समारंभ झाला आणि मनात आलं, आज शांताबाईंच्या घरी जावे, मनातल्या विचारानं, लगेच कृतीमध्ये रुपांतर केलं. प्रभादेवीहून मी बांद्र्याला साहित्य- सहवास मधील शाकुंतल बिल्डींग मध्ये गेलो. दारावरची बेल वाजवली आणि काय आश्चर्य ! खुद्द शांताबाईंनीच दरवाजा उघडला. "नमस्कार, मी चिंचोरे" मी म्हणालो. "पत्रं पाठविणारे" असे हसत हसत म्हणत, शांताबाईंनी माझे स्वागत केले.माझ्या अचानक जाण्याने, माझ्या मनावर आलेलं दडपण, क्षणात पळालं.

त्या पहिल्या भेटीमध्ये शांताबाईंचा आणि माझा खूप छान सुसंवाद झाला. त्यांनी माझ्या छंदाबद्दल आपुलकीने माहिती करून घेतली. त्यादिवशी संध्याकाळी दादरला त्यांचे "गुरुवर्य गडकरी" ह्यांचेविषयी व्याख्यान होते. त्यांच्याबरोबर त्यांनी मला दादर स्टेशनला सोडून त्या कार्यक्रम स्थळी गेल्या.

ऑगस्ट पंच्याऐंशीमध्ये शांताबाई पुण्यामध्ये स्थायिक झाल्या. पुणे-सातारा रोडवरच्या आदर्शनगरमध्ये त्यांचं वास्तव्य होतं. आता तर काय ?  शांताबाईंकडे माझे वरचेवर जाणे सुरु झाले. पत्रं पाठविणे बंद झालं आणि समक्ष भेटी घडू लागल्या.मला सुरुवातीला एका गोष्टीचं अवघड वाटलं ! ते म्हणजे त्यांना कोणत्या नावानं संबोधायचे ? त्या मला मातेसमान! त्यांच्या घरातील भाऊ, बहिणी, वहिनी सगळे "शांताबाई" ह्याच नावाने हाकारायचे. त्यांची भाचरं त्यांना "आत्याबाई" म्हणत.

एकदा मी त्यांना ह्याविषयी बोललो. त्या खळखळून हसल्या, म्हणाल्या, "अहो चिंचोरे मला शांताबाईच म्हणा, मुंबईला मला कॉलेजमध्ये विद्यार्थीही शांताबाईच म्हणत".

एक झालं, माझ्या सारख्या जाण्यानं, मी त्यांच्या घरचा कधी झालो, ते माझे मलाही कळलं नाही. शांताबाईंबरोबरच, त्यांचे भाऊ-भावजय, आप्पा आणि काकी तसेच त्यांच्या आईशी - वहिनीशी (त्या आईला वहिनी म्हणत) माझं घरातलं नातं जडलं.

शांताबाईंचा केंव्हाही सहज माझ्या घरी फोन येऊ लागला. मी घरी असो वा नसो, शांताबाई माझ्या घरातल्यांशीही प्रेमानं बोलत. दर चार-आठ दिवसाआड माझं त्यांच्याकडे जाणं होऊ लागलं ! कधी शांताबाईंकडे मी गेलो आणि त्यांच्याकडे कुणी कामासाठी आलेलं असायचं, अश्यावेळी शांताबाईंची आई-वहिनी, माझ्याशी गप्पागोष्टी करायच्या. मध्येच आत जाऊन सांगायच्या, "अगं शांताबाई तुझा चिंचोरे आलाय गं"!

शांताबाई जेव्हां मुंबईला होत्या तेव्हां त्यांच्या दर वाढदिवसाला, मी त्यांना शुभचिंतन पत्रं पाठवीत असे. पण आता तर त्या पुण्याला आल्या होत्या. शांताबाईंचा जन्मदिवस, तारखेने बारा ऑक्टोबरला आणि तिथीने नवरात्रातील सातवी माळ ! मी दोन्ही दिवशी शांताबाईंकडे जायचो. पण तरीही शांताबाईंना माझे वेगळेच कौतुक वाटायचे, ते म्हणजे मी त्यांच्या आईच्याही दर वाढदिवसाला जाऊन त्यांना नमस्कार करायचो. गोकुळाष्टमी हा तो दिवस !

शांताबाईंच्या पुण्यातील घराच्या वरच्या मजल्यावर, त्यांचं स्वतःच असं एक छोटेखानी ग्रंथालय होतं. त्यामध्ये विविध साहित्यिकांचे ग्रंथ शिस्तीमध्ये उभे ठाकलेले दिसायचे. शांताबाई ग्रंथांना जिवापलीकडे जपायच्या. अतिशय नीटनेटकी बांधणी असलेल्या नव्या पुस्तकांनाही त्या स्वतः वेष्टणे घालायच्या. वाचनासाठी पुस्तकांचा मुक्त वापर त्यांना मंजूर होता, परंतु पुस्तकाची पाने दुमडलेले त्यांना कधीही खपायचे नाही. पुस्तकं खराब होतील, कोपरे मुडपतील, बांधणी उसवेल, असा वापर त्यांना अजिबात चालायचा नाही. नव्या-जुन्या

पुस्तकांचा तो विशिष्ठ दर्प त्यांना आवडायचा. वाचनानंतर पुस्तकं जागच्याजागी ठेवायची त्यांची सवय स्पृहणीय होती.

शांताबाई गप्पांची मैफल फार छान जमवायच्या. त्यांच्या गप्पांमध्ये नेहेमीच निखळ, निर्मळ आनंद मिळायचा. विनोद, चेष्टामस्करीही चालायची. शांताबाईंची स्मरणशक्ती अफाट होती. कित्येकवेळा त्या नव्या-जुन्या कविता, गीतं, सुभाषितं, श्लोक, आर्या, दिंड्या, ओव्या घडाघड म्हणून दाखवायच्या. ब-याच वेळा सुभाशितांचा अर्थ सांगत. भाषांतरित भागाचा मूळ गाभा समजावून सांगायच्या. कधी कधी आम्ही दोघे, आठवणीतल्या विविध कवितांचे पठण करायचो. "बघ आई आकाशात, सूर्य हा आला", डॉ. वि. म. कुलकर्णींची "चावडीच्या पाठीमागे, जुना सरकारी वाडा",  केशवकुमार अर्थात आचार्य प्र.के. अत्रे ह्यांची "आजीच्या जवळी घड्याळ कसले", या आणि अश्या असंख्य कवितांची उजळणी होत असे.  पण माझी एक खोड होती, ती म्हणजे, मी ब-याच कविता, जुन्या गाण्यांच्या चालीवर म्हणत असे. उदाहरणार्थ, बघ आई आकाशात, ही कविता, कौन परदेसी तेरा, ह्या चालीवर तर, चावडीच्या पाठीमागे, मेरा दिल ये पुकारे आजा, तर आजीचे घड्याळ - चक्क शार्दुलविक्रीडीत असल्याने, शुभ मंगलच्या चालीत म्हणायचो. हास्याची कारंजी फुटत.

एकदा मात्र माझी फजिती झाली, मी एक कविता म्हणली, आणि मी त्यांना विचारले, शांताबाई ही कविता कोणाची ? माझ्या त्या प्रश्नावर शांताबाई मिश्कील हसत म्हणाल्या, "भल्या गृहस्था त्या कवितेच्या कवयित्री आपल्या समोर बसल्या आहेत". ती कविता होती. पैठणी !

शांताबाईंच्या विनोदी पण श्लेशपुर्वक बोलण्याचा एक सुंदर प्रसंग :- आदरणीय स्वरसम्राज्ञी लतादीदी आणि मीनाताई पुण्यास  आल्या होत्या. त्या दिवशी सकाळी, दिदींच्या घरी, शांताबाई आणि मी  गेलो होतो. दिवसभर गप्पा झाल्या. जेवण झाले. संध्याकाळी त्या मुंबईला निघाल्या. आम्ही जिना उतरत होतो. मी खालच्या पायरीवर होतो. शांताबाईंनी डाव्या हाताने

जिन्याचा कठडा धरला होता. त्यांना चालतांना, जिना चढता-उतरता त्रास व्यायाचा म्हणून त्यांचा उजवा हात मी धरला होता. एकच उंच असलेल्या पायरीवर पाय ठेवल्यावर, शांताबाई म्हणाल्या, "चिरंजीवा, आपापल्या पायरीने राहावे "! निमिशातच दीदी म्हणाल्या, "शांताबाई बरोब्बर, तुम्ही उंच पायरीवर आहात !" सगळेजण खळखळून हसले.

शांताबाई उमद्या मनाच्या होत्या. नवागतांना त्या नेहेमीच प्रोत्साहन द्यायच्या. माझ्यासारख्याने कुठे लिहिले, बोलले, तर त्या उत्स्फुर्तपणे मनमोकळी दाद द्यायच्या. चार जुलै सत्त्याण्णव हा दिवस मी कसा विसरेन ? भारतरत्न लतादीदी मंगेशकर ह्यांनी लिहिलेल्या लेखांचं संकलन, "फुले वेचिता" या पुस्तकाच्या रुपात त्या दिवशी प्रकाशित झालं. तो कालिदासदिन होता. मुंबई येथे डिसिल्व्हा शाळेच्या मैदानावर झालेल्या त्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे होते, संगीतकार दत्ता डावजेकर, पंडित जितेंद्र अभिषेकी ह्यांच्या शुभहस्ते "फुले वेचिता"चे प्रकाशन झाले होते. समारंभामध्ये, लतादिदींच्या सर्व लेखांचा मी एक संग्राहक - संकलक म्हणून माझेही मनोगत सादर झाले. साहित्य - संगीत - कला क्षेत्रातील अनेक मान्यवर त्या प्रसंगी उपस्थित होते. पंडित जितेंद्र अभिषेकी, मा. दत्ता डावजेकर साहेबांनी, त्यांच्या भाषणामध्ये माझे कौतुक केले. दुस-या दिवशी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये वर्तमानपत्रात ती बातमी आली. मी मुंबईहून पुण्याला पोहोचायच्या आधी शांताबाईंचा माझ्या घरी चार-पाच वेळा, फोन येऊन गेला, "माझ्या चिरंजीवाचे अभिनंदन"!

शांताबाईंकडे जाण्याने एक होऊ लागले, ते म्हणजे, दोन भेटींच्या दरम्यान, त्यांनी जे जे लेखन केलेले असायचे, ते लेखन, त्या मला आवर्जून वाचायला द्यायच्या ! काही वेळा, त्या स्वतःही लेखनातील काही संदर्भ वाचून दाखवायच्या. विशेष म्हणजे, त्या लेखनाचे प्रयोजन, त्या संदर्भातील मूळ कल्पना, स्मृती, प्रसंग, त्या लेखानाशी कसे निगडीत आहेत, ते सोदाहरण सांगायच्या. मी भाग्यवान असा की, त्यांचं बहुतांशी लेखन, प्रकाशनापूर्वीच मला वाचायला

मिळालं !अगदी शेवटी म्हणजे, त्यांनी केलेलं, ज्येष्ठ कवी गुलझारजींच्या काव्याचं - "त्रिवेणी"चे भाषांतर होय !

शांताबाई उगाचच गंभीर मुद्रा करून बसल्यात, असं पाहिल्याचे मला तरी आठवत नाही.हां, प्रसन्न वृत्तीने लिहिणा-या शांताबाई आजही डोळ्यांसमोर दिसतात. छोट्याश्या लाकडी डेस्कवर, एकाग्र होऊन, तन्मयतेने त्या कागदाचे तावच्या ताव लिहित, तेही शाई पेनने ! बॉलपेनने लिहिणे, त्यांना कधीच आवडले नव्हते.

शांताबाईंनी संपादित केलेला, माझ्या मते सर्वोत्तम ग्रंथ म्हणजे, "लता" होय ! ती. लतादिदींच्या कारकिर्दीला पंचवीस वर्षे पूर्ण झाली, म्हणून मौजने हा ग्रंथ, १९ एप्रिल १९६७ रोजी प्रकाशित केला होता. सप्टेंबर १९८८ मध्ये एके दिवशी संध्याकाळी, शांताबाई आणि मौजचे श्री. पु. भागवत माझ्या घरी निवांत आले होते. माझ्या छंदाविषयी, शांताबाईंनी, श्री. पु. भागवत ह्यांना काही सांगितले होते. गप्पांची ती अविस्मरणीय संध्याकाळ होती.

शांताबाईंबरोबर प्रवास करणं, म्हणजे आनंदपर्वणी असायची. वेगवेगळया निमित्ताने, त्यांच्यासह मी प्रवासाचे अनेक सुखद  अनुभव घेतले आहेत. एके दिवशी भल्या पहाटे, शांताबाईंचा फोन आला, म्हणाल्या, "चिरंजीवा, काल तुमचा फोन खूप वेळ एंगेज होता, आज, आत्ता आपल्याला मुंबईला प्रभुकुंजमध्ये  {ती. लतादीदी मंगेशकरांचे घरी} जायचे आहे. लवकर आवरा, मी घ्यायला येते, आणि मग पुढे जाऊ."  बाळकृष्णाप्रमाणे मी एका पायावर तयार झालो. आम्ही  मुंबईच्या दिशेने निघालो. तासाभरात आम्ही लोणावळ्याला पोहोचलो. चहासाठी गुरुकृपा हॉटेलमध्ये गेलो. त्या ठिकाणी कुठल्याश्या कॉलेजचे विद्यार्थी-विद्यार्थिनी सहलीसाठी आलेले दिसले. "अरे त्या बघा, शांता शेळके"- त्या घोळक्यातील एकाची आरोळी ! झालं, बघता-बघता, शांताबाईंच्याभोवती तिथेच गोलगर्दी जमली. कुणाला त्यांची स्वाक्षरी हवी होती, तर कुणाला त्यांच्याबरोबर फोटो काढायचे होते. शांताबाई मुलांमध्ये मस्त रममाण

झाल्या. सह्या झाल्या. फोटो झाले, आणि नंतर आम्ही गाडीत बसलो. वळणावर गाडी वळेपर्यंत ती सगळी मुलं - मुली हर्षभराने टाटा करत होती.

नारळी पौर्णिमेचा तो दिवस होता. खंडाळयाच्या डोंगरमाथ्यावर पाउस अक्षरशः कोसळत होता. निसर्गाची ती लीला पाहून, शांताबाई, थोड्याच गप्प बसल्या असतील ? शक्यच नाही. शांताबाईंनी कालिदासाच्या मेघदुतापासून अनेक कवींच्या पावसाच्या काव्यपंक्ती भराभर म्हणण्यास सुरुवात केली. ते डोंगर, त्या द-या, ती रानझाडे, ते धबधबे, सारेजण जणू शांताबाईंकडून स्वतःचे कौतुक ऐकून घेऊ लागले.

आम्ही मुंबईला पेडररोडवरील प्रभुकुंजच्या दाराशी पोहोचलो, तरी आमच्या गप्पागोष्टी सुरु होत्या. तो दिवस होता रक्षाबंधनाचा! आदरणीय दीदी, मीनाताई, आशाताई, उषाताई, आपल्यापेक्षा वयाने लहान असलेल्या पण कर्तृत्वाने महान असलेल्या आपल्या लाडक्या भावाला, हृदयनाथांना राखी बांधून औक्षण करीत होत्या.

शांताबाईंनी लिहिलेली गणपतीची गाणी, पंडितजी चालीत बांधत होते. मालकंसमधील "आले रे गणपती आज दारी रे",तसेच, हंसध्वनीमधील "दाता तू गणपती गजानन", तेव्हांचा हा प्रसंग, मी माझ्या मनामध्ये जपून ठेवलाय.

"मंगेशकर" घराविषयी त्यांना वाटणारा जिव्हाळा सर्वज्ञात आहे. त्या असंख्य प्रसंगांचा साक्षीदार होण्याचं सौभाग्य त्या परमेश्वराने मला दिले, मी भरून पावलो. प्रत्येक कार्यक्रमाला आम्ही बरोबर जायचो. मग तो कार्यक्रम गाण्याचा असो, शुभविवाहाचा असो, किंवा अगदी एखादा अनौपचारिक घरातला सुखसोहळा असो !

शांताबाईंना रेखाचित्रांची खूप आवड होती. लहान वयात आईच्या रांगोळयांनी, त्यांना आकृष्ट केलं होतं. त्यामुळे कुठल्याही पुस्तकात, अथवा मासिकात रेखाचित्र आढळलं, की, त्या आधी ते रेखाचित्र नीट बघायच्या आणि मग तसंच रेखाटायचा सराव करत असत. रेखाचित्रांची

पुस्तकही त्या स्वतःच्या संग्रहामध्ये जपून ठेवायच्या. शांताबाई गप्प बसल्या आणि त्यांच्या हातामध्ये कागद-पेन दिसलं की, खुश्शाल समजावं, की रेखांकन चालू आहे. मांजर हा त्यांच्या जिव्हाळयाचा प्राणी होता. त्यांच्या घरात, खोलीत, आजू-बाजूला सतत मांजर असायची. कधी कधी त्या कौतुकानं मांजराला जवळ घेऊन, अगदी माणसांप्रमाणे गप्पागोष्टी करायच्या. तर अश्या मांजराचे चित्र रेखाटणे, त्यांच्या सरावाचं होतं. अगदी एखाद्या कार्यक्रमाला गेल्यावर, मधल्या छोट्याश्या फुरसतीच्या क्षणी, निमंत्रण पत्रिकेवर, झटकन, बोकोबांची छबी,शांताबाईंच्या पेनमधून साकारली जायची.

ज्येष्ठ गायिका-चित्रकार उषाताई मंगेशकरांनी काढलेली असंख्य चित्रं - ग्रामोफोन रेकॉर्ड्सची कव्हर्स, सी डी, कॅसेट कव्हर्स, मोठी पेंटींग्ज पाहतांना तर शांताबाई भान हरखून जायच्या.

श्रीक्षेत्र आळंदी येथे संपन्न झालेल्या, साहित्य संमेलनाच्या शांताबाई शेळके अध्यक्ष होत्या, तर मा. लतादीदी मंगेशकर प्रमुख पाहुण्या होत्या. त्या तीन दिवसामध्ये आळंदीला साहित्य प्रेमींचं जे उधाण आलं होतं, त्याला तोड नाही. शब्द-स्वरांच्या पावन इंद्रायणीमध्ये श्रोतृवृंद यथेच्छ चिंब भिजला होता. शांताबाईंचा वाचकवर्ग, चाहतावर्ग केवढा मोठा होता, त्याचे एकत्रित दर्शन त्या ठिकाणी अनुभवावयास मिळाले होते.

शांताबाई, पुण्याच्या के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये तीनशे पंधरा क्रमांकाच्या खोलीमध्ये औषधोपचार घेत होत्या. मी, रोज सकाळी आणि संध्याकाळी तसेच सुटीच्या दिवशी दिवसभर तिथेच असायचो. अशाच एका सकाळी, मी हॉस्पिटलमध्ये गेलो तेव्हां शांताबाई म्हणाल्या, "चिरंजीवा, तुझी शांताबाई आंधळी झाली, आज सकाळीच, माझ्याहातून चष्मा खाली पडला, काडी तुटली." त्या दिवशी रविवार होता. चष्म्याची दुकानं बंद. मी, रास्ता पेठेत, पॉवरहाऊस स्टेशनजवळ दुकानं शोधीत फिरत होतो. एका बंद दुकानापाशी गेल्यावर कळलं, दुकानं-मालक वरच राहतो. मी वरती गेलो. दुकानदाराला सांगितले, "अहो, शांताबाई शेळके, कविता लिहिणा-या, गाणी लिहिणा-या, इथेच के.ई.एम.मध्ये ऍडमिट आहेत. त्यांच्या चष्म्याची काडी

तुटली आहे. प्लीज बसवून देता कां ?" शांताबाईंच्या त्या रसिक चाहत्याने, खाली येऊन दुकान उघडलं.

त्यानं चष्म्याची काडी दुरुस्त करून दिली, इतकंच काय, तो भला गृहस्थ, माझ्याबरोबर शांताबाईंना भेटायला आला.शांताबाई समक्ष भेटल्याचा आनंद, त्यांच्या चेह-यावरून ओसंडून वाहू लागला. चष्मा दुरुस्तीचे पैसे घेण्याचेही त्यांनी विनम्रपणे नाकारले !

असाच एक हृदयस्पर्शी प्रसंग ! शांताबाई आणि मी के.ई.एम.मध्ये बोलत होतो. वेळ दुपारी चार-सव्वाचारची होती. एवढ्यात दारावर टकटक असा आवाज आला. मी म्हणालो, "शांताबाई कुणीतरी व्ही.आय.पी. असणार." मी दार उघडले, अन् मी अवाक होऊन बघतच राहिलो ! "या, या, शांताबाई, बघा कोण आलंय तुम्हाला भेटायला....." शांताबाईंनी पडल्या-पडल्या दाराकडे वळून पाहिले. "या-या भाई-सुनीताबाई या." महाराष्ट्राचं लाडकं दैवत, साक्षात पु. ल. देशपांडे आले होते ! "शांताबाई गप्पांची मैफल घरी जमवू या, इथे काय करता ? लवकर ब-या व्हा आणि घरी या", इति पु.ल.! माझ्या मनात विचार आला, दोन मोठी माणसं ब-याच दिवसांनी भेटत आहेत. त्यांना बोलू द्यावे. म्हणून मी खोलीच्या बाहेर जाऊ लागलो. शांताबाईंच्या ते लक्षात आलं, "चिरंजीवा, इकडे या, मला माहितंय, बाहेर कां निघाला. बसा इथेच, भाई आणि तुम्ही मला एकाच प्रेमाने भेटता, भाई हे चिंचोरे...."! "हो, लताबाईंवर लिहिणारे"! पु.लंच्या मुखातील हे शब्द ऐकून माझ्या अंगावर आनंदाने काटा आला. पु. ल. आणि सुनीताबाईंना मी नमस्कार केला आणि तिथेच बाजूला उभा राहिलो.

पुढे शांताबाई ब-या होऊन घरी आल्या. आणि एक दिवशी पु.लंना देवाज्ञा झाल्याची कुवार्ता कळली. बालगंधर्वमध्ये झालेल्या शोकसभेला, स्वतःची तब्येत बरी नसतांना, शांताबाईंनी येण्याचा हट्ट धरला. मी त्यांना घेऊन बालगंधर्वमध्ये गेलो.शांताबाई बोलल्या, पण नंतर त्या खूप काळ बेचैन होत्या. बरेच दिवस जुन्या आठवणीत गुरफटल्या होत्या.

शांताबाई थोर साहित्यिका तर मी एक त्यांचा सामान्य वाचक ! पण आमच्यात आपलेपणाचं, आपुलकीच अकृत्रिम नातं शेवटपर्यंत टिकून राहिलं. शांताबाईंचं माझ्या घरी येणं म्हणजे आनंद पर्वणी असायची.माझी आई आणि सौ. ह्यांच्याशी घरगुती नाते निर्माण झाले होते. विशेष म्हणजे, माझ्या विवाहसमारंभाला शांताबाई आवर्जून पुण्याला आल्या. दिवसभर जमलेल्या गणगोतावळयामध्ये रमल्या. लक्ष्मी-पूजनाच्यावेळी शांताबाई म्हणाल्या, "चिरंजीवा, सौ.चे नाव बदलू नकोस, "भारती"च राहू दे. पुढे माझ्या कन्येच्या बारश्याला त्यांनी सुचविले, "अरे तिचे नाव मेधा ठेवा, मेधा म्हणजे बुद्धी." माझी मुलगी त्यांना नेहेमी "शांताआजी" म्हणायची. त्याचे त्यांना

खूप अप्रूप वाटायचे. त्या म्हणायच्या, "घरा-दारातली सर्व मुले मला शांताबाई म्हणतात. फक्त मेधा मला शांताआजी म्हणते." मेधाच्या पहिल्या वाढदिवसाला त्यांनी छानशी खुर्ची दिली होती. लहान मुलांची अनेक पुस्तके त्यांनी मेधाला दिली. त्या प्रत्येक पुस्तकावर त्यांनी लिहिले, "चिरंजीव मेधाला, शांताआजी कडून."

पुस्तकावरून आठवलं, शांताबाई मोठ्या मनानं ज्याला-त्याला पुस्तकं निर्मितीतलं श्रेय द्यायच्या. एकदा मी त्यांच्याकडे गेलो असता, त्यांनी नुकतीच लिहिलेली प्रस्तावना मला वाचायला दिली. शेवटच्या परिच्छेदापाशी मी घुटमळलो. म्हणालो. "अहो, शांताबाई, माझे कसले आभार मानता ?"त्यावर त्या म्हणाल्या, "अरे बाबा, माझ्या जुन्या कविता, गाणी इतस्ततः विखुरलेली होती. ती गोळा करण्यात तुमचा मोठा वाटा आहे. त्याचे श्रेय द्यायलाच हवे !" ते पुस्तकं होतं "फुलांचे दिवस, कळयांच्या राती"!

एकदा मी एका कार्यक्रमासाठी नाशिकला जाणार होतो. शांताबाई म्हणाल्या, "चिरंजीवा, ही दुर्मिळ इंग्रजी पुस्तके, तात्यांना -कुसुमाग्रजांना द्यायची आहेत, माझे त्यांच्याशी बोलणे झाले आहे." मी त्या पुस्तकांचा गठ्ठा बांधला, आणि नाशिक मुकामी वंदनीय कुसुमाग्रजांच्या घरी गेलो, त्यांची नि माझी ती पहिली समक्ष भेट होय ! त्या पूर्वी त्यांची मला आलेली तीन पत्रोत्तरे

माझ्या संग्रहात होती ! कुसुमाग्रजांच्या सहवासाने मी भारावून गेलो. त्यांचे प्रेमळ बोलणे, घरगुती अगत्याने वागवणे, हे माझ्यासाठी खूप काही होते.

सतत भरभरून बोलणा-या शांताबाई, अखेर एका दुःसाध्य आजाराला बळी पडल्या. दुस-याच्या मदतीने कां होईना, पण शांताबाई चालत-फिरत होत्या. अखेरीस दवाखान्यामध्ये दाखल करायच्या आधी काही दिवस, मी आणि माझी सौ. त्यांच्याकडे गेलो होतो. गुढीपाडव्याचा तो दिवस, काही अनाहूत हुरहुरीत गेला. संगीतकार मीनाताई मंगेशकर-खडीकर ह्यांनी स्वरबद्ध केलेली ध्वनिफीत नुकतीच प्रकाशित झाली होती. ती कॅसेट त्यांना देण्यास मीनाताईंनी मला सांगितले होते. शांताबाई म्हणाल्या, "चिरंजीवा, आत्ताच ऐकू या ही कॅसेट" शांताबाई ह्यांनी लिहिलेल्या त्या गाण्याचे शब्द होते, "तू नसता, मज संगे, वाट ही उन्हाची संगतीस एकांती वेदना मनाची"! ते गाणं गायले होते, उषाताई मंगेशकर ह्यांनी. त्या गाण्यानेही रसिकांना वेड लावले होते. आता जाणवतं शांताबाईंनी ते गाणं लिहिलं म्हणजे त्यांच्या माघारी, चाहत्यांची जी मनोवस्था होईल, त्याचं शब्दचित्रण त्यांनी आधीच लिहून ठेवलं की काय?

एके सकाळी मी दवाखान्यात गेल्यावर, डॉक्टरांनी मला विचारले, "तुमचे आणि त्यांचे नाते काय"? मी झटकन म्हणालो, "अहो काय सांगू ? रक्ताच्याही पलीकडचे, नात्या पलीकडचेही नाते आहे आमचे"! शांताबाई दवाख्यान्यात असतांना, समस्त मंगेशकर कुटुंबियांचा नि माझा फोनवर सकाळ-संध्याकाळ संपर्क होता.

चार जूनला दुपारी, डॉक्टर म्हणाले, "आता मनाची तयारी करा". माझ्या पायाखालची वाळू सरकली, मी कोलमडलो. "अहो दोन दिवसांनी त्यांची वहिनी अमेरिकेतून येत आहे. काहीही करा." अखेर सहा जूनची पहाट झाली, ती काळीज फाडून गेली...

मंगेशकर लोकांच्या साक्षीने, "चिरंजीव चिंचोरे " हे बिरूद त्यांनी मला मोठ्या प्रेमानं बहाल केलं होतं ! "चिरंजीव चिंचोरे, आज अमुक कार्यक्रमाला जायचे आहे, चिरंजीवा प्रकाशकांकडे जायचे आहे....", आजही माझ्या कानामध्ये शांताबाईंचा तो मधाळ आवाज सतत घुमत असतो, अन् माझं व्याकुळ मन आठवणींच्या हिंदोळ्यावर वर-खाली झुलू लागते......

उपेंद्र चिंचोरे
गणेशकृपा, ३८३ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०
फोन नं. ०२०-२४४८७३६९
chinchoreupendra@yahoo.com

# स. दा. रडके आणि सदानंद

सदाशिव दामोदर रडके त्याच्या नावाला स्मरून सतत दुर्मुखलेलाच असायचा. सगळे जग चुकीच्या किंवा वाईट गोष्टींनी भरले आहे, त्यात रहाण्याच्या लायकीचेच ते नाही असे त्याचे मत होते. त्याबद्दल इतर माणसे तक्रार का करत नाहीत ही त्याची सर्वात मोठी तक्रार असे. सगळे लोक त्याच्या वाईटावर टपून बसले आहेत असेही त्याला कधी कधी वाटत असे. त्याचे रडगाणे ऐकून कंटाळलेल्या एका माणसाने त्याला सांगितले की जवळच सदानंद नावाचा नेहमी आनंदात राहणारा एक सुखी माणूस राहतो. सदाशिवाचा त्यावर विश्वासच बसेना. तेंव्हा तो माणूस त्याला सदानंदाकडे घेऊनच गेला. सदाशिवाची लहान मुलगीसुध्दा हट्ट धरून त्याच्या मागे मागे तिथे गेली.

सदानंदाने त्यांचे स्वागत करून त्यांना दारातून आत यायला सांगितले. त्याचे एका खोलीचे घर पाहून सदानंद उद्गारला, "आत येऊन काय करू? तुमच्या डोक्यावर बसू?" सदानंदाने शांतपणे दोन घडीच्या खुर्च्या उघडून पुढे केल्या. कुरकुरतच सदाशिव एका खुर्चीवर बसत बोलला, "तुम्ही खूप सुखी आहात असे ऐकले होते, तुम्हाला काही प्रॉब्लेमच नाहीत का हो?" सदानंदाने उत्तर दिले, "अहो. तुम्ही आज माझ्याकडे पहिल्यांदाच आला आहात. आधी तुम्ही कोण ते सांगा. माझ्याबद्दल आपण नंतर बोलू." "माझे नाव स. दा. रडके" "तुम्ही कुठून आला आहात?" "जवळच माझा बंगला आहे, पण कोणी त्याच्याकडे लक्षच देत नाही हो. सगळा घाणेरडा झाला आहे. पहावे तिथे धूळ, डाग आणि भेगा दिसतात." "तुमच्या घरी आणखी कोण कोण असतात?" "आई, बाप, बहीण, भाऊ, बायको, २ मुले वगैरे भरपूर लोक आहेत, पण कोणी माझे ऐकतच नाहीत. सारखी कटकट करत असतात." "घराबाहेर तुमचे कोण मित्र वगैरे असतीलच." "छे! इथले सगळे लोक इथून तिथून अप्पलपोटे आणि बिलंदर आहेत. शिवाय वर मलाच फिदीफिदी

हसत असतात. इथे कोणाबरोबर संबंध ठेवायची मुळी कुणाची लायकीच नाही." "परगावी तुमचे कोणी आप्त असतील." "हट्! पुण्याची माणसं भारी खंवचट, कोल्हापूरची ठसकेबाज आणि नागपूरची तर नेहमी आपलाच बडेजाव सांगणारी. त्यांच्याशी कोण संबंध ठेवेल?" "बरं, आज माझ्याकडे कशासाठी आला आहात?" "तुम्ही खूप मजेत राहता, नेहमी चांगल्या मूडमध्ये असता असं यांनी सांगितलं म्हणून तुम्हाला भेटायला यांनीच मला इथं आणलं आहे. पण इथं तर एवढ्याशा टीचभर जागेत इतकी अडगळ आहे, शिवाय सगळीकडे धूळ, डाग आणि भेगा. मला तर हे पहावतसुध्दा नाही. तुम्ही कसं काय इथं सुखाने राहू शकता हो?" "ते माझं सिक्रेट आहे. एरवी मी कधी कुणाला सांगत नाही, पण तुम्हाला ऐकायचे असेल तर मी सांगेन, पण त्यासाठी आधी दोन मिनिटे तुम्हाला मी सांगेन ते करावे लागेल. घाबरू नका, तुम्हाला काहीही कष्ट पडणार नाहीत."

"सांगा."

"तुम्हाला माझं घर पहावत नाही ना? आपले डोळे मिटून घ्या आणि मी सांगतो ते मंत्र पाच पाच वेळा म्हणा." "श्रीगणेशायनमः"

"श्रीगणेशैन्म्ह"

"असे घाई घाईने म्हणलेत तर ते त्या देवाला समजणार नाहीत, जरा सावकाश म्हणा श्री ग णे शा य न मः"

त्यानंतर ॐ नमःशिवाय, ॐ नमो भगवते वासुदेवाय वगैरे आणखी काही देवांचे मंत्र त्याने सदाशिवाकडून पाच पाच वेळा म्हणवून घेतले. तोपर्यंत त्याच्या डोळ्यावरचा चष्मा हलकेच

काढला, त्यावर बसलेली धूळ, पडलेले डाग, रेघोट्या वगैरे पुसून तो स्वच्छ केला. तो त्याच्या डोळ्यावर पुन्हा चढवून खोलीतला दिवा मालवला आणि म्हंटले, "आता डोळे उघडलेत तरी चालेल."

"हे काय? सगळीकडे अंधार पसरला आहे."

"तुमच्या मनावरचं माझ्या खोलीचं तुम्हाला न आवडलेलं चित्र मी पुसून टाकलं आहे. आता मी दाखवतो ते पहा आणि लक्षात ठेवा."

असे म्हणून त्याने हातातल्या बॅटरीचा झोत एका मूर्तीवर टाकत विचारले, "कृष्णाची ही मूर्ती किती सुरेख आहे ना?"

"असेल, मग मी काय करू?"

"छान दिसते तरी आहे ना?"

"हो."

हातातल्या बॅटरीचा झोत भिंतीवर टांगलेल्या एका चित्रावर टाकून विचारले, "हा समुद्रकिना-याचा देखावा किती हुबेहूब काढला आहे ना?"

"असेल, पण आपल्याला त्याचा काय उपयोग आहे? त्या चित्रातल्या वा-यानं इथला उकाडा कमी होणार आहे का?"

"नाही, पण या चित्राकडे पहाणे तर चांगले वाटते तर आहे ना?"

बॅटरीचा झोत तिथे आलेल्या लहान मुलीच्या तोंडावर टाकून विचारले, "किती गोड मुलगी आहे ना? तुझीच आहे ही." असे म्हणत त्या मुलीला खुणेनेच सदाशिवाकडे पाठवले. त्यानेही तिला जवळ घेतले. घरातला दिवा लावून सदानंदाने सांगितले, "आता तुम्हाला दाखवलेल्या तीन्ही

सुंदर गोष्टी या इथेच होत्या, पण मघाशी तुमचं लक्ष त्यांच्याकडे गेलं नाही. तुम्हाला माझ्या घरातच नाही तर सगळीकडेच धूळ, डाग आणि भेगा दिसत होत्या, कारण त्या तुमच्या चष्म्याच्या काचेवर होत्या. इथे असलेले पेन, कागद, पुस्तके, कात्री, सुईदोरा, स्क्रू ड्रायव्हर, कुंचा, झाडू वगैरेसारख्या तुम्हाला अडगळ वाटणा-या या सगळ्या गोष्टी माझ्या उपयोगाच्या वस्तू आहेत. मुद्दामच मी त्या सगळ्या आपल्या नजरेला येता जाता सहज दिसतील अशा ठेवल्या आहेत. ज्या वेळी ज्या गोष्टीची मला गरज पडते तेंव्हा ती मला लगेच मिळते, तिला शोधावे लागत नाही की बाहेर जाऊन ती आणावी लागत नाही. सुंदर मूर्ती किंवा फ्रेम वगैरेंकडे पाहतांना मला आनंद मिळतो, त्यांचा मला किती उपयोग होतो याचा विचार मी करत नाही, त्याचप्रमाणे उपयुक्त वस्तूंमुळे माझी कामे लवकर होतात, त्यांच्याविना ती खोळंबून रहात नाहीत, यातूनही मला वेगळ्या प्रकारचा आनंद मिळतो. त्या वस्तू दिसायला सुंदर असण्याची गरज नाही, त्या लगेच हाती येणे महत्वाचे असते. ज्याचा मला काही उपयोगही नाही आणि जो चांगला दिसतही नाही असा कचरा मी केराच्या टोपलीत टाकून देतो. नंतर मला त्याचा त्रास होत नाही.

माणसांच्या बाबतीतसुध्दा असंच असतं. काही काही माणसं खूप हुषार, जाणकार, विनोदी, अनुभवी, देखणी, प्रेमळ वगैरे असतात, त्यांच्या सहवासात आपल्याला आनंद मिळतो. आपल्या कामाच्या बाबतीत त्यांचा आपल्याला उपयोग होईलच असे नाही. तर अनेक माणसांकडे कुठलेही विशेष गुण नसले तरी ती आपल्या कामाची असतात. त्यांची आपल्याला खूप मदत होते. या सर्वांकडून आपल्याला आनंद मिळत असतो. वस्तू आणि माणूस यात एक फरक मात्र असतो. वस्तू आपण होऊन काही करत नाहीत. आपण त्यांचा उपयोग आपल्याला हवा तसा करून घेतो. माणसं मात्र दुस-याला आनंद किंवा मदत देऊ शकतात तसेच त्रासही देऊ शकतात. एवढे लक्षात ठेवले की आपल्याला काय करायचे ते ठरवता येते. ज्याच्याकडून जेवढा आनंद, सहकार्य, मदत वगैरे मिळेल तेवढे घ्यावे. त्याच्या इतर बाबतीतील उणीवांकडे जास्त लक्ष देऊ

नये, आवश्यक वाटल्यास त्यापासून सावध रहावे एवढेच करायचा मी प्रयत्न करतो. त्यामुळे मला माझ्या सभोवतालचे जग वाईट आहे असे वाटत नाही. या जगातल्या आपल्याला आवडतील त्या आणि उपयोगाच्या वस्तू शोधाव्यात, त्या आणून ठेवून घ्याव्यात, न आवडणा-या सोडून द्याव्यात. त्याचप्रमाणे आपल्याला आवडणारी, प्रेम आणि मदत करणारी माणसे जोडावीत, कोणाबरोबर गहन विषयावर चर्चा करावी, कोणाशी थट्टामस्करी करावी, कोणाचे मजेदार अनुभव ऐकून घ्यावेत, कोणाकडून मनोरंजक माहिती घ्यावी. कोणाचे गाणे ऐकावे, कोणाचा अभिनय पहावा अशा असंख्य प्रकारे आपल्याला इतर लोकांकडून आनंद मिळत असतो. त्याचप्रमाणे आपल्या कामात असंख्य लोकांचे सहकार्य किंवा मदत आपल्याला मिळत असते. ती करणे हे त्यांचे कामच आहे, त्याची त्यांनाही गरज आहे किंवा त्यापासून त्यांचाही फायदा होतो वगैरे विचार करण्यापेक्षा आपल्याला लाभ झाला आहे याकडे लक्ष दिले तर त्यापासून समाधान मिळेल. माणसांचे आपसातले संबंध परस्परावर अवलंबून असतात. त्यामुळे समोरच्या माणसाने आपल्याला कसे वागवावे असे आपल्याला वाटते तसे आपण त्याच्याशी वागलो, तर तोही आपणास तशी वागणूक देण्याची शक्यता असते. दुस-यांकडून मदतीची अपेक्षा करायची असल्यास जे जे आपण त्यांच्यासाठी करू शकतो ते करत रहावे. ज्यांच्याशी पटत नसेल त्यांच्यापासून दूर रहावे. आपली दृष्टी स्वच्छ ठेवली, त्यावर धूळ बसू दिली नाही, डाग, चरे पडू दिले नाहीत तर आपल्याला ते सगळीकडे आणि सारखे दिसत राहणार नाहीत. एवढे केले तर या जगात आनंदी रहाणे शक्य आहे."

आनंद घारे

# आमचे क्लासेस जॉइन करा

शाळा सुरु होऊन दोन दिवस झाले होते. राणेसर त्यांच्या गणिताच्या तासासाठी 'दहावी अ'च्या वर्गात आले. इतर शिक्षकांप्रमाणे त्यांनीही सर्वांना यंदा दहावीचे वर्ष आहे आणि त्यांनी भरपूर अभ्यास करायला हवा याबद्दल सूचना दिल्या. त्याच वर्गात सोहम नावाचा विद्यार्थी होता जो गेल्या वर्षी परीक्षेत पहिला आला होता आणि गणितात तो विशेष हुशार असल्याने सरांचाही लाडका होता. आपला तास संपल्यावर राणेसरांनी त्याला शाळा सुटल्यावर भेटायला सांगितले त्याप्रमाणे तोही सर्व विद्यार्थी गेल्यावर स्टाफरूमकडे निघाला. सर त्याची वाट बघत स्टाफ रूमच्याबाहेरच उभे होते.

"काय सर, तुम्ही बोलावलं होतं मला ?"

"हो, अरे यंदा दहावी, अभ्यास जोरदार असायला हवा या वर्षी !"

"ठाउक आहे सर, सुट्टीत सुरुवात केलीये थोडी"

"ते अपेक्षित होतंच मला, अभ्यास कसा चाललाय मग? "

"चालू आहे...नेहमीप्रमाणे "

"तू या वर्षीही क्लास लावला नाहीयेस म्हणे. गेल्या वर्षीपर्यंत ठीक होते पण आता दहावीला एक-एक मार्क किती महत्त्वाचा ठरतो माहिती आहे ना"

"माहिती आहे सर...पण मला...नाही जायचंय क्लासला "तो थोडासा अडखळत बोलला.

तो असं बोलल्यावर सरही क्षणभर त्याकडे पाहू लागले.

"तुझ्या घरी काही अडचण आहे का? म्हणजे पैशाची वगैरे? "

"नाही...नाही, तसे काहीच नाहीये. बाबांनी मला विचारले होते क्लास लावायचा आहे का म्हणून पण मलाच आवडत नाही."

"अच्छा, पण तुला जमेल का हे सगळे, या वर्षीही तू शाळेतून पहिला येशील या बद्दल मला काही शंका नाही पण..."

"तुम्ही आहात ना सर, अभ्यासात मला काही अडचण असेल तर विचारेनच तुम्हाला "

"ते आम्ही आहोतच रे, पण तू क्लास लावलास तर जास्त उजळणी होईल, त्याचा तुला फायदाच होईल ना "

"त्याची गरज नाहीये. मी माझा अभ्यास स्वत: करू शकतो या बद्दल मला खात्री आहे आणि...क्लासेस हा प्रकार मला कधीच पटत नाही...म्हणून मग नाहीच."

"ठीक आहे मग,जशी तुझी इच्छा."

सर निघाले तसा तो ही माघारी वळून चालू लागला.

पुढील काही महिन्यात शाळेत जेव्हा जेव्हा परीक्षा झाल्या त्या सगळयात त्याची अभ्यासातील प्रगती दिसत होतीच. अधून-मधून सोहमने बोलल्याप्रमाणे तो काही शंका विचारायचा तेव्हा आपण याची काही मदत करू शकतो म्हणून सरांनाच जास्त आनंद वाटायचा. जसजशी अंतिम परीक्षा जवळ येऊ लागली तशी सर्वांनाच खात्री वाटू लागली की सोहमच शाळेतून पहिला येणार. बघता बघता परीक्षा आली आणि संपली देखील.

लवकरच परीक्षेच्या निकालाचा दिवस उजाडला तेव्हा सर्वांच्या अपेक्षेप्रमाणे सोहमने उत्तम मार्क्स मिळवले होते. मेरीट ४ मार्कांनी हुकली होती याचे इतरांना थोडे वाईट वाटले पण सोहमला सरांनी विचारले तेव्हा तो म्हणाला,

" मला बिलकुल वाईट वाटले नाही सर. मला जे हवे होते ते मी मिळवले. यापुढेही मिळवत राहीनच."

आणि शेवटी त्याने बोलल्याप्रमाणे क्लासेसशिवायच यशाचे शिखर गाठले होते. राणेसरांना आपल्या नव्या विद्यार्थ्यांना सांगण्यासारखी अजून एक गोष्ट मिळाली होती. "

आता काही दिवसांपूर्वीच दहावी-बारावीचे निकाल लागलेत आणि त्यामुळे सगळीकडे 'आमच्या क्लासच्या' विद्यार्थ्यांनी यशाचे झेंडे रोवल्याचे फलक झळकू लागलेत. पेपरभर, टी.व्ही. वर आमच्या क्लासचे गुणवंत विद्यार्थी आणि क्लासचा यशाचा आलेख यांच्या बातम्या दिसत आहेत. मेहनतीने यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक होण्यात काहीच गैर नाही पण या सगळया मागचा उद्देश हा क्लासची प्रसिद्धी आणि त्यातून अधिकाधिक पैसा मिळवणे असाच असतो. 'कोचिंग क्लास' घेणाऱ्या कुठल्याही व्यक्तीला शिक्षणाची तळमळ वा गरीब विद्यार्थ्यांना सहकार्य वगैरे करण्याचा हेतू असेल असे बिलकुल वाटत नाही.

मला कायम त्या विद्यार्थ्यांचे कौतुक वाटत आले आहे जे गरिबीतून जिद्दीने अभ्यास करून पुढे आले आहेत. केवळ गरीब आहेत म्हणून नाही पण ते सर्वच जण जे स्वप्न पाहतात आणि ते पूर्ण करण्यासाठी तितक्याच जोमाने कष्ट देखील करतात. आपल्याला पुढे काय व्हायचे आहे हे बऱ्याच जणांना कळत नसले तरी या बाबत जरा विद्यार्थ्यांनी विचार करायला हवा. दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना जबाबदारीची फार जाणीव नसली तरी घरात आणि आजूबाजूला काय चालले आहे हे कळण्याइतपत समज त्यांना असते. आपले पालक मेहनतीने कमावलेला पैसा केवळ आपल्या सुरक्षित भवितव्यासाठी खर्च करत असतात. हल्ली दहावी-बारावीचा गाजावाजा होऊन क्लासेसचा खर्च इतका वाढला आहे की या तीन वर्षात साधारणपणे लाख-दीड लाख रुपये क्लासेसच्या फीसाठी खर्च होतात. अडमिशनचा खर्च वगैरे वेगळाच. सांगायचा मुद्दा हा आहे की इतका वारेमाप खर्च आपल्या शिक्षणासाठी होतो आहे हे ठाउक असूनही कित्येक विद्यार्थी ह्या खर्चाला पर्याय नाहीच असा समज बाळगून आहेत आणि पर्यायाने त्यांचे पालकसुद्धा हे मान्य करतात की क्लासशिवाय मुले पास होणार नाहीत वा चांगले मार्क्स मिळवणार नाहीत.

सगळी मुले क्लास लावतात म्हणून मलाही पाहिजे असे जे त्यांचे म्हणणे असते त्याचे कारण म्हणजे एकतर या सगळयांचाच आपण क्लासशिवाय चांगला अभ्यास करून पास होऊ असा त्यांना विश्वास नसतो वा आपल्या क्षमतेविषयी न्यूनगंड असतो. दुसरे म्हणजे या वयात जिथे घरच्यांपेक्षा मित्रमंडळी जवळची वाटतात तिथे साहजिकच त्यांच्या सहवासात राहायला अधिक आवडते. क्लासच्या निमित्ताने मित्रांसोबत मजा मस्ती करायला मिळते जी क्लास नसता करता येणे अवघड असते. क्लासच्या निमित्ताने नवे मित्र-मैत्रीण जोडता येतात हे काही नव्याने सांगायला नको. नवे कपडे आणि नव्या फॅशनचे प्रदर्शन करायला मिळते हे सुद्धा

क्लासला जाण्यामागे एक कारण असते आणि यातील कैकांना आपल्यासाठी पालकांनी भरमसाठ फी भरली आहे ही सामान्य गोष्ट वाटते.

आता हे सगळे मी यासाठी लिहित नाहीये की मी शाळेत हुशार विद्यार्थी होतो आणि मला कधीच क्लासची आवश्यकता भासली नव्हती. पण क्लासची कल्पनाच मुळात मला पटत नाही. फार फार तर खाजगी शिकवणी असेल तर ठीक आहे पण 'कोचिंग क्लास' नावाचा प्रकार गेल्या काही वर्षात बळावला आहे तो अगदीच अमान्य आहे. आपण स्वत:हूनच नकारात्मक पद्धतीने विचार केल्याने 'कोचिंग क्लास'ला पर्याय नाही, याच निष्कर्षावर शेवटी पोहोचतो.

माझ्या बाबतीत एक गंमतीचा किस्सा घडला होता. बारावीच्या परीक्षेत कॉलेजमधून मी पहिला आलो होतो आणि हे कॉलेजभर बऱ्याच जणांना ठाऊकही होते. पण जो मुलगा दुसरा आला होता तो एका नावाजलेल्या क्लासचा विद्यार्थी होता आणि त्यामुळे आमच्याच कॉलेजच्या बाहेर त्याचा फोटो आणि अभिनंदनपर फलक लागले होते. वास्तविक मी कुठल्याही क्लासशिवाय पहिला आलो याचे कौतुक व्हायला हवे होते. अर्थात मला या गोष्टीचा राग नाही आला उलट हसूच आले.

शाळा-कॉलेजात म्हणजे अगदी बी.कॉम पर्यंत सुद्धा मी कुठली शंका असेल तर शिक्षकांना विचारायला कचरायचो नाही आणि याबाबत एखादा अपवाद वगळला तर कुणीच शिक्षक विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यास टाळाटाळ करत नाहीत. ही म्हटली तर खूप साधी गोष्ट आहे म्हटले तर बरीच मोठी आहे. क्लासला जाणारे विद्यार्थी शाळेत-कॉलेजमध्ये कधीच शिक्षकांना शंका वा प्रश्न विचारत नाहीत, त्यात त्यांना भीती वाटते की कमीपणा वाटतो ते त्यांना ठावूक पण हे असे आहे. क्लासेसमध्ये काही फालतू प्रकार चालतात असे म्हणणे नाहीये माझे पण जे काही चालते त्याचे मोल तितके नक्कीच नाही जितके लोक समजतात. क्लासेसमध्ये फार फार तर वेगळे काय होते ते अभ्यासाची उजळणी आणि शिवाय अवांतर परीक्षा. हे सारे काही विद्यार्थ्यांच्या मनाची तयारी असेल तर तो करू शकतो हे क्लासला न जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या यशावरून दिसून येते. शिक्षणासाठी इतका पैसा मोजायची वेळ का आली आहे? मान्य आहे की सगळीकडे स्पर्धा वाढली आहे. पण आपल्या मुलाने अधिक चांगले मार्क्स मिळवून चांगल्या कॉलेजला अडमिशन घ्यावे यासाठी इतका पैसा ओतण्यापेक्षा मुलांमध्ये ते क्लासेसशिवाय हे यश मिळवू शकतात हा आत्मविश्वास निर्माण करायची कुणीच तसदी घेत नाही का ?.

आधी म्हटल्याप्रमाणे मी आजपर्यंत कुठलेच क्लास लावले नाही पण मी सगळ्याच परीक्षांत उत्तम मार्कांनी पास होत आलो आहे. मी काही फार बुद्धिमान प्राणी नाही जे काही यश मिळाले ते अभ्यासातील सातत्याने आणि मेहनतीनेच मिळाले. क्लासेस नसल्याचा उलट प्रचंड फायदा व्हायचा आणि आजही होतो. मला स्वत:साठी कायम भरपूर वेळ मिळतो. मी जेव्हा-जेव्हा माझ्या मित्रांशी बोलतो ते सारेच या धावपळीच्या चक्रात अडकलेले असतात आणि मुळात हे बदलू शकते हे त्यांच्या मनाला मान्य नसते. आज पहिली-दुसरी पासून पालक आपल्या चिमुरड्यांना क्लासेसना घालत आहेत. इतका अभ्यास लादल्यावर कसे व्हायचे त्यांचे ? पर्याय आहे पण तो आपण स्वत:हून टाळतो आहोत. कसे बदलणार हे चित्र ?

तुम्हाला काय वाटते?

सागर कोकणे

बी-२०६, प्लॉट नं.१०५, ओम गगनगिरी सोसायटी, सेक्टर-१४, कोपरखैरणे, नवी मुंबई -४०० ७०९ मो.९६६४३३७५८८

sagarkokne_spk@yahoo.com

# मुलाखत

(एक reporter एका मंत्र्याची मुलाखत घेतेय)

पत्रकार - नमस्कार रोख नाहीतर ठोक या कार्यक्रमात आपल स्वागत

माझ्यासोबत आहेत लोकप्रिय नेते रावजी हांडगे पाटील

पाटील - ओ बाई हांडगे नाही खांडगे पाटील

पत्रकार - माफ कर आपल्या सोबत आहेत खांडगे पाटील..तर मला सांगा

तुम्ही का उभे राहिलात ?

पाटील-तुम्ही बसायला खुर्ची नाही दिलीत म्हणून

पत्रकार-तसे नाही निवडणुकीला का उभे राहिलात ?

पाटील-बसायला खुर्ची मिळावी म्हणून

पत्रकार -म्हणजे तुम्ही सतत खुर्चीचाच विचार करता तर

पाटील-अहो मग अर्ध आयुष्य खर्ची घालवलय आम्ही खुर्चीसाठी

पत्रकार- मला सांगा तुमचे गाव कोणते?

पाटील-शिंगापूर

पत्रकार-तुम्हाला शिंगणापूर म्हणायचं आहे का?

पाटील-मग आम्ही शिंगापुरच तर म्हणालो

पत्रकार-बर ते सोडा मला सांगा तुम्हाला राजकारना पेक्षा समाजकारण का आवडत ?

पाटील-विनाकारण

पत्रकार –काय?

पाटील..नाही म्हणजे मी ना कारण नसताना काहीच करत नाही .मला लहानपणापासून आवड आहे

समाजकारणाची .आता हेच बघाना नुकतेच  माझ्या पाठीचे  abortion झाले तरीही आज

मी इथे आलोय

पत्रकार -तुम्हाला operation म्हणायचं आहे का

पाटील- हो तेच ते ..

पत्रकार-तेच ते नसते हो, खूप फरक आहे यात. मला सांगा तुम्ही निवडून आल्यानंतर जनतेसाठी काय   करणार

पाटील-तेच जे आत्तापर्यंत करत आलोय

पत्रकार- म्हणजे काहीच नाही करणार

पाटील-काय म्हणालात?

पत्रकार-नाही म्हणजे थोडक्यात काय तर तुम्ही जनतेचा विकास करणार

पाटील- घंटा

पत्रकार-म्हणजे

पाटील-नाही हे आमच निवडणूक चिन्ह आहे ..घंटा..ते सांगत होतो

पत्रकार-बर आता आपण पाटील  यांच्याबरोबर त्यांनी मुंबईचा कसा विकास केलाय हे पाहणार आहोत

बर मला सांगा आपण कशाने जायचं मुंबई फिरायला ?

पाटील-बेस्ट ने

पत्रकार- पण बेस्टमध्ये एक बेस्टच नाव सोडले तर काहीच बेस्ट नाही..बेस्टचा होर्न सोडून सारेकाही वाजत असते..

पाटील-चला मग आपण चालत जावू .अहो तिकडे जावू नका ,पडाल

पत्रकार-का? काय झाल?

पाटील-अहो तिकडे मिठी नदी आहे

पत्रकार-काय अहो हे तर गटार आहे

पाटील-हल्ली यालाच सारे मिठी नदी म्हणतात

पत्रकार-अहो पण मी तर ऐकलेलं या नदीच पण गोड,निळशार आहे म्हणून

पाटील-नाही बरीचशी घाण यात सोडल्याने रंग बदललाय पण पाण्याची चव कायम आहे हवतर चाखून बघा

पत्रकार-नाही नको..चला आपण तिकडे जावू या राणीच्या बागेत

पाटील-अहो पुढे जावू नका तिकडे वाघाची गुहा आहे

पत्रकार-अय्या सो sweat .वाघ

पाटील-वाघ तुम्हाला sweat वाटतो..

पत्रकार-अहो पण या गुहेत वाघच दिसत नाहीये

पाटील-मी म्हटलं वाघाची गुहा आहे,गुहेत वाघ आहे अस कधी म्हणालो मी..

पत्रकार-अहो मग उपयोग काय सामान्यांना या बागेचा

पाटील-मला सांगा बाग कोणाची आहे

पत्रकार-राणीची

पाटील-मग ती आणि आम्ही बगून घेवू काय ते..बर मला सांगा हा जुना वाडा कसला आहे

पत्रकार-अहो हि मिल आहे ..जिथे काहीवर्षांपुर्वी इथला कामगार कोई मिल गया गाणे म्हणत काम करायचा .पण इथल्या मालकांनी हि जमीन मॉलला विकून जाम माल कमावला आणि कामगार देशोधडीला लागले

पाटील-ok मग आम्ही निवडून आल्यावर त्यांच्यासाठी नक्कीच काहीतरी करू

पत्रकार - सर हा बघा getway ऑफ इंडिया ..बघा या समुद्रात किती घाण झालीये

पाटील-त्या अगोदर मला सांगा हा गेट कोणी उघडा ठेवला..आता मला कळाल आतंकवादी आत कसे येतात .अगोदर या गेटला दरवाजा बसवायला हवा..

पत्रकार-वा सर काय logic आहे तुमचे..बर सर तुम्ही मघासपासून पाहताय मुंबईत गर्दी वाढतेय

तुम्हाला काय वाटत मुंबई कोणाची आहे

पाटील-मुंबई गोऱ्यांची आहे (पत्रकार लगेच वाक्य तोडते )

पत्रकार-म्हणजे काळ्या माणसांनी मुंबईत राहायचे नाही..हा तर वर्णभेद झाला.तुम्ही नेते असून असे करता..ब्रेकिंग न्यूज

पाटील-ओ हे बघा मला अस म्हणायचं आहे

पत्रकार-बघा यांना असच म्हणायचं आहे

पाटील-ओ मला बोलू द्या..माझ मत आहे मुंबईत काळी,गोरी, जाडी, बुटकी सगळी लोक राहू शकतात

पत्रकार -नाही म्हणजे मला म्हणायचं आहे कि मुंबईत परप्रांतीय राहू शकत नाहीत का?

पाटील- राहू शकतात ना

पत्रकार-ok  म्हणजे तुम्हाला अस म्हणायचं आहे कि मुंबई मराठी माणसाची नाहीये ..ब्रेकिंग न्यूज..

पाटील-अहो माझ ऐका, मला हे म्हणायचं आहे

पत्रकार-बघा यांना हेच म्हणायचं आहे

पाटील-नाही मला म्हणायचं आहे मुंबई मराठी माणसांची आहे

पत्रकार-म्हणजे अप्रत्यक्षरीत्या तुम्हाला अस म्हणायचं आहे कि परप्रांतीयांनी मुंबईत येवू नये

ब्रेकिंग न्यूज..परप्रांतीयांनी मुंबईत येवू नये

पाटील-अहो मला काय म्हणायचं आहे हे तुम्हीच ठरवताय ,तुम्ही गुडघ्यावर पडल्यात का

पत्रकार-नाही का हो

पाटील-नाही तुमचा मेंदू तिथेच असतो म्हणून म्हटलं.

पत्रकार-बर मला सांगा तुम्ही घोटाळा करण्यात  आदर्श ठरलाय याबद्दल तुमच काय मत आहे

पाटील-नाही हो तुमचा माझ्याशी गैरसंबंध झालाय

पत्रकार -काय..तुम्हाला गैरसमज म्हणायचं आहे का?

पाटील-मी तेच म्हणालो ना...

पत्रकार-नाही हो गैरसमज आणि गैरसंबंध यत खूप फरक आहे

तर असो हे होते हांडगे पाटील माफ करा खांडगे पाटील यांचे असे मत आहे कि हे निवडून आल्यावर जनतेचा नक्की विकास करतील

पाटील-घंटा

पत्रकार-काय

पाटील-माझे निवडणूक चिन्ह

(समाप्त )

विशाल कदम

kvishal43@gmail.com

# जिंदगी का सफर



१७ जून ,संध्याकाळी सहाच्या सुमारास मोबाईल वाजला.पलीकडे एक पाकिस्तानी मित्र बोलत होता.त्याने निर्विकारपणे बातमी दिली.'ओ,यार तुम्हारा राजेश खन्ना मर गया'. बातमी अनपेक्षित नव्हती.सकाळीच त्याला परत हॉस्पिटल मधे दाखल केल्याचे ऐकले होते.त्यामुळे कदाचित आणखीन तब्येत खालावून जीवाचे बरे-वाईट होण्याची  शक्यता होतीच.आठवडाभरापूर्वी तो असाच हॉस्पिटल मधे दखल झाला होता.तेव्हाच मिडिया ने 'तयारी' केली होती.पहिली 'ब्रेकिंग न्यूज' दिली कि  त्याच्यावरची फिल्म पण channel वर तयार होती. पण तेव्हा त्यांची तयारी फुकट गेली.!(काहींनी तो बरा होऊन घरी गेला तरीहि ती फिल्म दाखवून पण दिली !!) यावेळेस मित्राची 'ती' बातमी  खोटी असण्याची शक्यात खोटी असण्याची शक्यता कमी होती.धावत घरी गेलो.टीवी लावला .इंटरनेट वर चेक केले पण कुठेच काही बातमी नव्हती.मग जरा हायसे वाटले.असं म्हणतात कि जिवंतपणी मृत्यूची बातमी पसरली तर  त्या माणसाचे आयुष्य वाढतं.तसं असेल तर 'त्या' पाकिस्तानी मित्राचा राग न येता मी त्याला दुवाच दिला असता.मृत्यू ची बातमी ऐकून जर राजेश खन्ना चे आयुष्य वाढणार असले तर लाख वेळा अशा बातम्या ऐकायची माझी तयारी होती.मित्राच्या दृष्टीने ती निव्वळ बातमी होती.पण आमच्या पिढीच्या दृष्टीने तो एक आघात होता.माझ्या भाव-भावनांशी त्याला

काही घेणे देणे नव्हते..बातमी देऊन त्याने फोन बंद केला होता.पण माझ्या भाव विश्वातल्या आठवणीचा दरवाजा मात्र तो उघडून गेला होता.

१९७० च्या दशकाच्या सुरुवातीला जेव्हा आमची पिढी वयाच्या दशकात शिरत होती तेव्हा पासून राजेश खन्ना नावाचे गारुड आमच्या मनावर राज्य करू लागलं होतं.१९६५ च्या कुठल्याशा स्पर्धेत त्याची निवड झाली होती आणि लगेच बबिता बरोबर 'राज ' मिळाला.पण सर्वप्रथम रिलीज झाला तो चेतन आनंद चा इंद्राणी मुखर्जी बरोबर 'आखरी खत'. सुरवातीचे हे दोन्ही चित्रपट तसे आपटले.तसाच नसीर हुसैन चा 'बहारोके सपने' देखील.पण १९६९ साली शक्ती सामंता चा 'आराधना' रोक्सी ला लागला आणि राजेश खन्ना एका रात्रीत स्टार झाला.आराधना बरोबर किशोर कुमार च्या कारकिर्दीला पण वेग आला.आधी किशोर देव आनंद चा आवाज म्हणून ओळखला जायचा पण आता राजेश खन्ना चा आवाज म्हणून ओळखला जाऊ लागला.दिलीप,राज,देव हि त्रयी उताराला लागली होती.नवीन पिढी एका आयडॉल च्या शोधात होती.तो त्यांना राजेश खन्ना च्या रूपाने मिळाला,त्याचे mannerism ,मान तिरकी करत गाणे म्हणण्याची स्टाईल ,दोन्ही डोळे मिचकावून बोलण्याची लकब,हसरा चेहरा त्या पिढीला एकदम आपलासा वाटला.त्याच साली आलेल्या बी.आर. चोप्रा च्या 'इत्तेफ़ाक़' ,'दो रास्ते' मधे त्याच्या अभिनयाची चमक दिसली.वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी राजेश खन्ना superstar पदावर आरूढ झाला.मग त्याला मागे वळून पाहायला फुरसतच नाही मिळाली.७० साली खामोशी,सफर सारख्या चित्रपटात गंभीर भमिका करून त्यांनी लोकांची मने जिंकली आणि नंदा बरोबर 'दि ट्रेन'मधे 'गुलाबी आंखे म्हणत सस्पेन्स थ्रीलर मधे पण काम केले.तोपर्यंत राजेश खन्ना लोकांना आवडयला लागला होतं ६९ साली रोक्सी ला आराधना गोल्डन जुबिली साजरी करत असतानाच मिनर्वा ला 'दो रास्ते 'मध्ये तो मुमताज बरोबर 'चूप गये तारे'म्हणत गर्दी खेचत होता.(जुन्या मिनर्वा मधला दो रास्ते हा शेवटचा चित्रपट .नंतर ते पडून नवीन बांधण्यात आले आणि नवीन मिनर्वा मधला पहिला चित्रपट होता 'लाल पत्थर')'दो रास्ते' नंतर त्याचा आमने सामने असलेला पहिला डबल रोल (आराधना मध्ये पहिला राजेश मरतो मग दुसरा जन्म घेतो) मनमोहन देसाई चा 'सच्चा झुटा' dreamland ला लागला आणि

'दिल को देखो चेहरा न देखो  म्हणत राजेश यशाची आणखी एक पायरी चढला .त्यावर्षी चे फिल्मफेअर  अवार्ड देखील मिळवले.त्याकाळी लग्नाच्या वरातीत जी काही निवडक गाणी वाजवली जायची त्यात 'मेरी प्यारी बहानिया' चा वरचा क्रमांक होता.पण ७१ साली ह्रीशिकेश मुखर्जी चा 'आनंद 'स्वस्तिक ला लागला आणि याने लोकांच्या हृदयात घर केले.हा चित्रपट त्याला कारकीर्दीच्या सर्वोच्च शिखरावर घेऊन गेला.असं म्हणतात हृषिदांच्या मनात  हा चित्रपट राज कपूर ला घेऊन काढायचे विचार कित्येक वर्ष  घोळत होते.पण जेव्हा आनंद काढायची वेळ आली तेव्हा राज कपूर चे वय त्याच्या चेहऱ्यावर दिसायला लागले होते.हृषीदांनी राजेश ची निवड केली आणि राजेश ने देखील आलेल्या संधी ची सोने केले. ७१ साली मुंबईत स्वस्तिक ला लागलेला 'आनंद 'सिल्वर जुबिली करूनच उतरला.त्यात राजेशचे ते बाबूमोशाय म्हणणे,जिंदगी बडी होनी चाहिये लम्बी नही.उदासी क्या खुबसुरत नही होती बाबूमोशाय?,तुम्हे क्या आशीर्वाद देऊ बहन ये भी तो नही कह सकता कि मेरी उमर तुम्हे लग जाये.हम सब रंगमंच कि कठ्पुतलीया है जिनकी डोर उपरवाले कि उन्गलीयोसे बंधी हुई है ,आनंद चा एकेक डायलॉग त्यावेळचे रेडियो प्रोग्राम ऐकून आजही स्मरणात आहे.आनंद बघून थेटर च्या बाहेर पडलेला पब्लिक गहिवरून डोळे पुसतच बाहेर पडायचा.आनंद ने त्याच्या हृदयात घर केलेले असायचे.आनंद राजेश खन्ना ला कारकीर्दीच्या सर्वोच्च स्थानावर  घेऊन गेला.स्वस्तिक मध्ये आनंद गर्दी खेचत असताना अलंकार ला तो 'आन मिलो सजना' मध्ये आशा पारेख बरोबर  'अच्छा तो हम चालते है 'म्हणत पब्लिक ला वेड लावत होता.नाझ ला मर्यादा मध्ये मालासिन्हा बरोबर 'चुपकेसे दिल दै नही तो' म्हणत छेड काढत होता.तर 'अंदाज' मध्ये हेमा मालिनी ला  मोटार सायकल वर बसवून 'जिंदगी एक सफर है सुहाना' म्हणत  मुंबईची सैर घडवून आणत होता.'अंदाज' मध्ये इंटर्वल च्या आधी जेव्हा तो मरतो तेव्हा अखं थेटर हळहळायचे.अंदाज मधले त्याचे नाकाच्या मध्यावर थोडा खाली खेचून गॉगल घातलेले पोस्टर लोकांना आकर्षून घेत होते.त्यावेळेस तो जे करेल ती स्टाईल व्हायची .आनंद पासून त्याने घातलेल्या गुरु शर्ट  ची फेशन आली .अंदाज मध्ये pant वर शर्ट  घालून त्यावर बेल्ट लावायची भन्नाट कल्पना त्याचीच (त्याने ते पोट लपवण्यासाठी केले हि गोष्ट वेगळी !) Novelty  ला

'हाथी मेरे साथी' मध्ये 'चल चल मेरे हाथी' म्हणत आबाल वृद्धाना वेड लावत होता.(बंगलोर ला हाथी.. चे शूटिंग करताना राजेश च्या डोळयाला हत्ती चा दात लागल्याची अफवा पसरल्यावर निर्मात्यांचे धाबे दणाणले होते आणि fans च्या हृदयाचा ठोका चुकला होता.)७२ ला ताडदेव ला गंगा जमना हे थेटर उभे राहिले आणि 'सच्चाई छुप नही सकती'म्हणत मिशी लावलेला राजेश चा 'दुश्मन' लोकांना प्यारा झाला.रोक्सी हे तर राजेश च्या चित्रपटांचे माहेरघर झाले होते.आराधना नंतर आलेला कटी पतंग व त्यानंतर अमर प्रेम यात राजेश,किशोर आर डी च्या संगीतात लोकांना न्हावू घालत होते.त्याचवेळी लिबर्टी ला 'आपण देश' मध्ये तो मुमताज बरोबर 'सून चंपा सून तारा'करत 'दुनिया मे लोगो को धोका कभी हो जाता है' म्हणत आरडी च्या आवाजात गर्जत होता.पण हि गर्जना राजेश ची स्वतःची झोप उडवीत होती.याच काळापासून राजेश चे पिक्चर पडायला सुरुवात झाली होती.दिल दौलत दुनिया,मेहबूब कि मेहंदी ,बावर्ची जोरू, का गुलाम ,मेरे जीवन साथी,मालिक ,शेह्जादा द्वारे अपयशाच्या निसरड्या पायऱ्या उतरायला सुरुवात झाली होती .मग सुरु झाली हे superstar पद आपल्याकडे कायम ठेवण्याची धडपड.७३ ला फक्त 'अ' या आद्याक्षराने आपल्या चित्रपटांची सुरुवात करणारे जे.ओमप्रकाश चा 'अ' कि कडी तोडकर अशी जाहिरात केलेला 'राजा रानी' फ्लोप ठरला.पण यश चोप्रा production चा पहिला चित्रपट 'दाग' मिनर्वा ला हीट गेला.हृषिदा चा 'नमकहराम 'Novelty ला चालला आणि राजेश खन्ना ने आपण अजून संपलो नाहीं हे दाखवून दिले.पण सूर्य अस्ताला जाताना जसा मोठा होतो तसे हे होते.आनंद आणि नमक हराम मध्ये राजेश ला तुल्यबळ लढत देणारा नवख्या अमिताभ चा जंजीर ७३ साली इम्पेरिअल ला लागला.रोमांटीक हिरो चा जमाना संपत आला होता.Action युगाची सुरुवात होत होती.पण राजेश हा बदल स्वीकारायला तयार नव्हता.७४ साली आप कि कसम,प्रेम नगर,रोटी हीट झाले.परत राजेश खन्ना कॅम्प मधून राजेश खन्ना च्या comeback घोषणा झाली.पण त्याच साली तिकडे अमिताभ चा 'दिवार' आला आणि अमिताभ ने आपले स्थान पक्के केले.राजेश मात्र अपयशाच्या खाईत गटांगळ्या खात

होता.अजनबी ,हमशकल,प्रेमकहाणी,आक्रमण,महाचोर,बंडलबाज,मेहबूबा ,त्याग,कर्म,चलता पुर्जा ,अनुरोध,आशिक हू बहारोन्का ,आईना,पलको कि छाव मे,जनता हवालदार,प्रेम बंधन,मजनून,रेड रोज,आंचल..... अपयशाची मालिकाच लागली.मधेच एखादा chaillababu व अमरदीप हीट व्हायचा आणि काका च्या कॅम्प मधून परत comeback ची घोषण व्हायची .पण राजेश चा जमाना संपला होता,ज्या वेगाने तो यशाच्या शिखरावर चढला त्याच्या दुप्पट वेगाने तो अपयशाच्या दरीत फेकला गेला.यशाला विनम्रतेची ,विनयाची जोड मिळाली तर पाय जमिनीवर राहतात आणि अहंकाराची किनार लाभली तर ते यश डोक्यात जातं.माझ्या सारखा मीच हा गंड राहतो.

बांद्रा च्या ज्या कार्टर रोड वर राजेंद्र कुमार चा 'डिम्पल'हा बंगला त्याने विकत घेऊन त्याचे 'आशीर्वाद' हे नामकरण केले होते.त्या आशीर्वाद बंगल्या समोर एके काळी राजेश खन्ना ची एक झलक पाहण्यासाठी चाहत्यांची रांग लागलेली असायची.त्याचे नुसते दर्शन होताच जे चित्कार बाहेर पडायचे त्याने तो देखील सुखावला जायचा.देव देव म्हणजे काय?हा प्रश्न त्याला पडायचा.त्याच्या चाहत्यांच्या दृष्टीने तो पृथ्वीतलावरचा देवच होता.ते त्याची पूजा करायचे.त्याची नुसती गाडी दिसली तर तिला तरुणींचा गराडा पडायचा.आणि गाडी वर चुबनांचा वर्षाव होऊन ती लिपस्टिक च्या मार्क्स ने न्हाऊन निघायची..गाडी निघून जाताच टायर खालची धूळ मुली सिंदूर म्हणून कपाळाला लावायच्या. त्याच्या नुसत्या फोटो बरोबर अनेक तरुणींनी त्याला मनोमन वरून लग्न लावले होते.तरुणींची रक्ताने लिहिलेली पत्रे आशीर्वाद वर यायची असे एक न अनेक किस्से.

एकेकाळी या बंगल्याच्या बाहेर निर्मात्यांची रांग लागलेली असायची.तो आशीर्वाद बंगला आता ओस पडला होता.संध्याकाळी गर्दी व्यायची ती त्याच्या चाहत्यांची नव्हे तर त्याच्या गोतावळ्यातील त्याच्या चमच्यांची .ते म्हणायचे 'उपर आका नीचे काका' त्याला ते खरे वाटायचे. superstar पदाची नशा हवी हवीशी वाटायची.१९७३ साली BBC ने त्याच्यावर Bombay superstar नावाची documentry केली होती.देश -विदेशातून लोकं त्याला बघायला यायचे. दिल दौलत दुनिया,त्याग,भोला भाला,चलता पुर्जा,नौकरी,मेहबूब कि मेहंदी,दुश्मन दोस्त,असे अनेक चित्रपट पूर्ण होऊन त्यांचे भवितव्य

दिसायला लागल्यावर आपल्या कारकीर्दीवर त्याचा परिणाम होऊ नये म्हणून रिलीज होण्यापासून लांबवले.

८० नंतर पण कुदरत,राजपूत,धनवान ,दर्द सारखे त्याचे चित्रपट आले .मधूनच एखादा टीना मुनीम बरोबर फिफ्टी फिफ्टी,सौतन हीट व्हायचा.पण आता तो पूर्वीचा राजेश राहिला नव्हता.शबाना आझमी बरोबर'थोडीसी बेवफाई' म्हणत 'अवतार' घ्यायचा.पण बात जमत नव्हती.मग त्याने राजकारणात उडी घेतली.तिथेही बात जमि नाहीं आणि एकेकाळचा राजेश खन्ना नावाचा superstar अलग अलग पडायला लागला.त्याच्या वैयक्तिक आयुष्यात न शिरलेले जास्त चांगले.कलाकाराचे खाजगी आयुष्य हे बाहेर चर्चेचा विषय असते. पण राजेश आपल्याला बाहेरून जसा भावला,आवडला तसाच आपण त्याचा स्वीकार केला.त्याच्या भूमिकांच्या आपण प्रेमात पडलो.त्याची अदाकारी भावली,त्याचे संवाद मनाला कुठेतरी भिडले,त्याच्या लकबी डोळयांना सुखावून गेल्या.एकेकाळी आमच्या कळत्या नकळत्या वयात मनाच्या भावविश्वात त्याने प्रवेश केला.कुठेतरी त्याने आम्हाला सिनेमाचे वेड लावले.सिनेमा बद्दलची ओढ निर्माण केली.त्याची अदाकारी,त्याच्या चित्रपटातील गाणी गुणगुणत आम्ही मोठे झालो.मोठे झाल्यावर आम्हाला आमचे नवीन आयडॉल्स सापडले.पण तरीही आम्ही राजेश खन्ना ला सोडले नव्हते.त्याच्या पडत्या काळातही आम्हाला मनापासून वाटायचे कि ह्याचा हा चित्रपट तरी हिट व्हावा.आमच्यासाठी नाही तर केवळ त्याच्यासाठी.कारण आम्ही राजेश खन्ना नावाचा तो भारावलेला काळ विसरूच शकत नाही.म्हणून राजेश खन्ना ला उद्धेशुनच म्हणतो.........

"आनंद मध्ये जेव्हा ' तू जिंदगी कैसी ही पहेली हाय' असं म्हणाला होतास तेव्हा आम्हालाही ते एक कोडे वाटून आम्ही माना डोलावल्या होत्या .नंतर तू याच जीवनाला खेळकर पणे बघत' अंदाज' मध्ये मोटार सायकल वर बेदरकारपणे गात होतास'जिंदगी एक सफर ही सुहाना,यहा कल क्या हो किसने जाना' आम्हाला हे हि पटले होते. मग तूच 'सफर'मध्ये 'जिंदगी का सफर है ये कैसा सफर'म्हणून सवाल केला होता आणि आमचे डोळे पाणावले होते.मग तूच 'आप कि कसम 'मध्ये आमची समजूत काढलीस 'जिंदगी के सफर मी गुजर जाते है जो मकाम वोह फिर नाही आते'आम्ही हेही समजून घेतले.पण जीवनाचे हे सर्व तत्वज्ञान गाण्यातून ऐकणं आणि

पडद्यावर साकारणं सोपं आहे रे.तुझ्या जाण्यानंतर आता जाणवतेय कि जीवन हे किती क्षणभंगुर आहे.शेवटी तुझ्या दाग मधील काव्यात्मक ओळीचा आधार घेतो

" आप न जाने मुझको समझते क्या? मैं तो कूछ भी नही.

इस कदर प्यार इतनी बडी चीज मैं रखुंगा कहा?इस कदर प्यार रखने के काबिल नही.

मुझको इतनी मोहोब्बत न दोस्तो,सोचलो दोस्तो! इस कदर प्यार कैसे सम्भालुंगा मैं ?मैं तो कूछ भी नही.

प्यार अगर एक पल का भी मिल सके तो बडी चीज है जिंदगी के लिये मगर आदमी को ये भी मिलता नही

मुझको इतनी मोहोब्बत मिली आपसे ये मेरा हक नही मेरी तकदीर है,
मैं जमाने के नजरोमे कूछ भी न था
मेरी आंखो मी अबतक वो तस्वीर है ,
इस मोहोब्बत के बदले क्या नजर दु
मैं तो कूछ भी नही,

इज्जते,चाहते,उल्फते,शोहरते कोई चीज दुनिया मे रहती नही
,आज मैं हू जहां कल कोई और था,
ये भी एक दौर है ,वोह भी एक दौर था ,
आज इतनी मोहोब्बत न दो दोस्तो ,
के मेरे कल कि खतिर कूछ भी न रहे
आज का प्यार थोडा बचाके रखो मेरे कल के लिये
,कल !! कल जो गुमनाम है,कल जो सुनसान है,
कल जो अनजान है,कल जो वीरान है

मैं तो कूछ भी नही मैं तो कूछ भी नही..........
अलविदा राजेश !!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!

प्रशांत कुलकर्णी
coolkarnipr@gmail .com

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी ही २३०० वर्षांपासून बोलली आणि लिहीली जाणारी भाषा आहे. दोन हजार वर्षांपुर्वी मराठीत गाथा सप्तशती नांवाची सातशे पुस्तके होती. जगातल्या आजच्या बहुसंख्य तेव्हा भाषांचा जन्मही झाला नव्हता. मराठीत तुकोबा ज्ञानेश्वरांसारखे महान संतकवी होऊन गेले. पुलं , जीएं सारखे महान लेखक गेल्या शतकात होऊन गेले. आणि असे महान लेखक या पुढेही याच मराठी भाषेत जन्माला येतील.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत गाभवनाची कल्पना मांडली आहे. आपल्या घरातले वाल, वाटाणे, चवळी असतात ना! त्यांच्या आत एक छोट्टुशी पानांची जोडी असते. हे वाल, वाटाणे, चवळी जर मातीत रुजवली तर त्यातून मोड बाहेर पडतो आणि त्याचं मूळ होतं. आणि ही जी छोट्टुशी पानं असतात त्यांच्यातून बनतो वेल किंवा वृक्ष. आणि या वेलीला पुन्हा शेंगा येतात. आणि त्यातून पुन्हा हजारो दाणे. आणि त्यात पुन्हा गाभवनं. म्हणून ज्ञानोबा या एका एका दाण्यात एक एक वन उभं राहिल अशी क्षमता असते असं मानतात.  पण हा दाणा आपण भाजीत घालून खाल्ला की संपलं.

अशीच असते मानवी प्रतिभाही. मराठी भाषेत किती तरी प्रतिभावान व्यक्ती साहित्याच्या बागा उभारू शकतील अशा क्षमतेच्या असतात. पण त्यांना योग्यवेळी वाचक/प्रकाशक/प्रसिद्धी मिळत नाहीत. आणि त्यांच्या या साहित्याचा आनंद लोकांपर्यंत कधीच पोहोचत नाही.

त्याचबरोबार असेही लाखो वाचक असतात, ज्यांना काही नवीन छान साहित्य वाचायची इच्छा असते. पण त्यांना पुस्तकं मिळत नाहीत. परवडत नाहीत. कोणती घ्यावीत आणि

वाचावीत ते कळत नाही. अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठानने नवीन साहित्यिकांसाठी ई पुस्तकांचे व्यासपीठ उभे केले. आणि लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली. येणारा काळ हा ई पुस्तकांचा काळ आहे. पुस्तक वाचण्यासाठी मंडळी आता टॅब्लेट पिसी, लॅपटॉपच नव्हे तर मोबाईलचाही वापर करतात. अशा वेळी या ई जगतात मराठी पुस्तकांना मानाचे स्थान निर्माण व्हावे म्हणून ई साहित्य प्रतिष्ठान झगडत असते.

चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना अडिचशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ना धों महानोर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, शंभूराजे असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. चारशेहून अधिक नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकर्यांच्या आत्महत्या, दहशतवाद, स्त्रियांवरील अत्याचार अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी संगीत कानसेनचे ई वर्ग चालवले. नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणार्या पुस्तिकांची मालिका “दुर्ग दुर्गट भारी” द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची उभारी दिली. “जिथे जिथे मराठी माणूस, तिथे तिथे ज्ञानेश्वरी” ही चळवळ आपण पहात आहातच. मराठमोळ्या इतिहासाची जाण निर्माण होण्यासाठी मराठी रियासत हा एक भव्य प्रोजेक्ट ई साहित्य प्रतिष्ठानने हाती घेतला आहे. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबर्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील.

सव्वा लाखभर रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही चालू ठेवूच. आम्हाला प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसे जगभर पसरलेली आहेत. निदान सहा कोटी तरी साक्षर आहेत. मग ई पुस्तके निदान एक कोटी लोकांपर्यंत जायला हवीत अशी आमची महत्त्वाकांक्षा आहे. आमचीच जावीत असे नाही. कुणाची ना कुणाची जावीत. कारण मराठीत असे अनेक लोक आणि संस्था आहेत जे असे काम करत आहेत.

मराठी भाषेत असे असंख्य आय टी, सॉफ़्टवेअर तज्ञ आहेत ज्यांना अशा प्रकारच्या ज्ञानप्रसाराच्या साधनांची माहिती असेल. सध्या असे अनेक जण देश परदेशात असतील. आम्ही आज या आय टी सॉफ़्टवेअर तज्ञांना आवाहन करत आहोत की मराठी भाषेसाठी एवढे कराच. मराठी पुस्तके कमी किंमतीत घरोघर पोहोचण्यासाठी काही शोध लावा. काही सॉफ़्टवेअर बनवा. काही नाविन्यपूर्ण गॅजेट बनवा. आम्हाला त्याची माहिती द्या.

आपल्या या कार्याची माहिती esahity@gmail.com वर पाठवा. संपर्कात रहा

**महाराष्ट्री जन्मास आल्याप्रमाणे । महादिव्य हातून काही घडो ॥**विंदा

- ई साहित्य प्रतिष्ठान
- ई साहित्य प्रतिष्ठान फेसबुक
- ईत्यर्थ फेसबुक
- ईज्ञानेश्वरी.कॉम
- मराठीरियासत.कॉम

# आवाहन

ईत्यर्थ हे एक मुक्तपीठ आहे. आमच्या वाचकवर्गातील लेखकांची येथे नेहमीच स्वागत असते.

ईत्यर्थ येत्या ऑगस्ट महिन्यात घेऊन येत आहे

## ईत्यर्थ स्वातंत्र्य विशेषांक.

स्वातंत्र्य मग ते देशाचे असो की स्वतःचे, भूमीचे असो वा भूमिकेचे, त्याबद्दल आपले लिखाण आम्हास पाठवा etyarth.esahity@gmail.com वर. निवडक लिखाणास ईत्यर्थमध्ये समाविष्ट आम्ही करूच!